न १८८५
. सं. ठाणें.
काव्य
३६
२

३२५
काव्य

...NATH NARAYAN SANE, B.A...

नं [redacted] म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक गो. प. गोस्वामी | सन १८८५ |
|---|---|---|
| काव्य | | |
| संग्रहालय क्रमांक | पुस्तकाचें नांव श्री. अहल्याबाई होळकर यांचे पद्यात्मक चरित्र | |
| ३५ १८९ | | |

KASHINATH NARAYAN SANE, B.A.

वा. क्रमांक ३६/२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नं. ............
ता. ............

इंदूर संस्थानच्या महाराणी

# श्रीमती अहल्याबाईसाहेब होळकर

यांचें पद्यात्मक चरित्र

हें लघुकाव्य

गोविंद एकनाथ गोसावी स्कूलमास्तर खानापूर

यांनीं रचिलें.

मया न परिशीलितं विविध-गद्य-पद्यादिकं ॥
नचापि बुधसंगतिः परिजनानुसक्तामतिः ॥
तथापि मम मानसं भवति तेऽपि नुत्युत्सुकं ॥
कुरुष्व मम शारदे विमल-बुद्धि-दानं शिवे ॥१॥

[ ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत ]

हरी सखाराम खानोलकर, यांनीं

सदानंद छापखान्यांत छापविलें.

सन १८९६

किंमत ०|१२ आणे.

# अभिप्राय.

मीं पुस्तक वांचिलें व मला तें सर्व चांगलें वाटलें; यांत कांहीं शंका नाहीं. कोठें कोठें दूरान्वय दिसून येतो परंतु तो आपला हा प्रथमच प्रयत्न असल्यामुळें असणें साहजिक आहे. मुळींच ज्याला एक साधीही कविता करितां येणार नाहीं त्यानें एवढी आपली काव्य-कल्पना पाहिली ह्मणजे विस्मित होणें साहजिक आहे, ह्मणून मला वाचण्यास फार आनंद वाटला. सर्व ठिकाणीं बहुतेक प्रसादगुण पूर्ण आहे. कळावें १८।७।९६

**हरी महादेव भडकमकर. बी. ए.**

संस्कृत भाषेचे प्रोफेसर

**विल्सन कॉलेज ( मुंबई. )**

रा० गोविंद एकनाथ गोसावी यांनीं रचलेलें "श्रीमतीदेवी अहल्याबाई साहेब होळकर" यांचें काव्यबद्ध-चरित्र मीं पाहिलें. मुख्यत : ग्रंथांत **शार्दूलविक्रीडित, शिखरिणी, स्रग्धरा, पृथ्वी** वगैरे सुश्राव्य वृत्तांचा भरणा शुद्ध व सरळभाषेनें केला आहे. कवितेचें व्याकरण व छंदःशास्त्र यांत कोठें चूक झालेली दिसत नाहीं. हल्लीं होणाऱ्या काव्यांत हें चांगल्यांपैकीं एक आहे म्हणण्यास मला हरकत दिसत नाहीं. पौरोभाग्य व जनांचें भिन्नरुचित्व यांनीं कोणास निराळेपणा वाटल्यास नाइलाज आहे. सदर ऐतिहासिक काव्य श्रवणीय व आदरणीय आहे. ४।७।९६

**पांडुरंग अमृत शास्त्री जळगांवकर.**

नांदूरा ( वऱ्हाड )

वा.काव्य ३८

# प्रस्तावना

परोकारी व सदय असे सत्पुरुष व साध्वी स्त्रिया यांचीं चरित्रें सहृदय मनुष्यानें कितीही वेळ वाचिलीं, तरी पुनरपि वाचावीशींच वाटतात; आणि मनुष्याची ही इच्छा तृप्त होण्याचे मार्ग मुद्रणकलेनें तर फार सोपे झाले आहेत. हीं सध्यांच्याकाळीं परमेश्वराची कृपाच समजली पाहिजे.

दूध हा पदार्थ रुचि-संबंधानें कोणत्याही पात्रांतून घेतला असतां, मिष्ट लागतोच. परंतु उत्तम व स्वच्छपात्राच्या योगानें घेणारास जास्त आनंद होतो, हें सर्वांस अनुभवानें माहित आहेच. त्याचप्रमाणें ग्रंथाचें आहे. वतुस्तः हें काव्य गीर्वाण-भाषेंत व कवि-कुल-गुरु कालिदासासारख्या सर्वमान्य कवीनें केलें असतें तर तें विशेष त्हृदयंगम झालें असतें हें उघड आहे.

महाराष्ट्र-भाषेंतही मोरोपंत वामन वगैरे कवींनीं अत्युत्तम व सर्वमान्य ग्रंथ केले आहेत. त्यां-पैकींच कोणींही प्रस्तुत काव्य केलें असतें तरी फार बरें झालें असतें. परंतु देशभाषेची थोडीशी-अगदीं थोडी-कां होईना-सेवा करावी हा उद्देश मनांत धरून मीं यथामत्या सेवा केली आहे. हा माझा पहिलाच प्रयत्न आहे. व तो कितपत साधला आहे हें पाहण्याचें काम सुज्ञांचें आहे.

गुणदोषौ बुधो गृह्णन्निंदु-क्ष्वेडाविवेश्वरः ।
शिरसा श्लाघते पूर्वं परं कंठे नियच्छति ॥

वरील श्लोकांत सांगितलेल्या शंकराच्या विभूती-प्रमाणेंच सज्जन हे दोषत्यागी व गुण-ग्राही असतातच करितां, ग्रंथांतील गुण घेण्याबद्दल त्यांचीं निराळी प्रार्थना करावयास नको.

विद्वद्वर्य रा० रा० हरी महादेव भडकमकर बी. ए. विलसनकॉलेजचे गीर्वाणभाषेचे प्रोफेसर यांनीं आपला अमूल्य वेळ खर्चून हें काव्य समग्र वाचून पाहिलें व जागजागीं फार महत्त्वाच्या सूचना केल्या त्यांबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें त्याचप्रमाणें वे० शा० सं० रा० रा० पाडुरंग अमृतशास्त्री जळगांवकर यांनींही हा समग्र ग्रंथ वाचून पाहिला व सूचना केल्या. त्यांचाही मी फार ऋणी आहें वि.रा.रा. रावसाहेब निलकंठ नारायण भट डे.ए. इन्स्पेक्टर जि० बुलढाणा यांनींही या ग्रंथाचा कांहीं भाग वाचून पाहिला त्याबद्दलही त्यांचा आभारी आहें.

हें काव्य रचतांना रा० रा० गजानन चिंतामण देव यांनीं लिहिलेला " श्रीमंत अहल्याबाईसाहेब होळकर " नांवाचा गद्य ग्रंथ फार उपयोगी पडला त्याबद्दल त्यांचे व मि० रा० रा० हरी सखाराम खानोलकर यांनीं हें काव्य प्रकाशित केलें त्यांजबद्दल त्यांचेही मजवर संस्मरणीय उपकार झाले आहेत.

सर्व सुज्ञ व रसिक लोकांनीं योग्य आश्रय व उत्तेजन दिल्यास **श्रीमल्हारराव होळकर, श्री परशुरामभाऊ पटवर्धन, श्रीछत्रपति शिवाजी महाराज, श्रीजगद्गुरु शंकराचार्य** इत्यादिकांच्या पद्य चरित्रांनीं देशभाषेची व सुज्ञांची सेवा करण्याचा मानस आहे. तो शेवटास नेण्यास सच्चिदानंद परमात्मा शक्ति देवो, एवढी त्या सर्वेश-चरणीं प्रार्थना नमस्कारपूर्वक करीत आहें.

खानापूर,
सपटंबर १८९६

गोविंद एकनाथ गोसावी
इनामदार पळसगांवकर.

सूचना—शुद्धिपत्राप्रमाणें पुस्तक दुरुस्त करून वाचावें.

———

वा. काव्य ३६
ना.

( आर्या. )

श्री हरिहरभक्ता तूं, देवि अहल्ये वरा धराभूषा ॥
पूषा तुज साधु म्हणे, ख्याता तुज सम न बाण-तनुभूषा ॥१॥

देवि अहल्याबाई, झालीस जगत्रयांत तूं धन्या ॥
न न्याय-धर्म-निरता, अन्या कलिमाजिं ऐकिली कन्या ॥२॥

जाणे धर्म करीना, त्या स्तवितो कोण पंडितंमन्या ॥
न न्याय धर्म निरता, अन्या कलिमाजिं ऐकिली कन्या ॥३॥

धर्मार्थ गोत्रजन्या, किंवा झालीस तूं धरा-जन्या ॥
तुज देवि भेटली जी, सत्कीर्ति कधींच हेत राजन्या ॥४॥

न त्यजसि नर्मदेतें, देवि तुझी ती बहुप्रिया आली ॥
गंगेचीहि सखी हे, कीं उभयमनांत सत्क्रिया आली ॥५॥

श्री-विष्णु-पदी स्तविली, त्वद्भक्ता हे तुलाहि मानावें ॥
विश्व जिला वानितसें, का न मयूरें हि तीस वानावें ॥६॥

मोरोपंत.

# विषयाऽनुक्रम.


अंक १ ला ( अहिल्या-पति-जनन ) .... .... .... १

अंक २ रा ( अहिल्या-जनन ) .... .... .... ४

अंक ३ रा ( अहिल्या-विवाह ) .... .... .... ८

अंक ४ था ( संसारसुख ) .... .... .... .... १३

अंक ५ वा ( पति-निधन ) .... .... .... .... १६

अंक ६ वा ( श्वशुरनिधन ) .... .... .... .... २१

अंक ७ वा ( पुत्रनिधन ) .... .... .... .... २७

अंक ८ वा ( राज्य संकट ) .... .... .... .... ३१

अंक ९ वा ( तुकोजि-सिंहासन-प्राप्ति ) .... .... .... ४०

अंक १० वा ( तीर्थयात्रा ) .... .... .... .... ४४

अंक ११ वा ( राज्येक्षण ) .... .... .... .... ४८

अंक १२ वा ( अन्यनृप-व्यवहार ) .... .... .... ५४

अंक १३ वा ( दान-स्वभाव-दर्शन ) .... .... .... ५६

अंक १४ वा ( कैलासगमन ) .... .... .... .... ६३

# शुद्धिपत्र.

| पान | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | २८ | सकलां | सकला |
| ४ | ४ | बा | वा |
| ५ | १९ | करून | करुन |
| १० | ७ | आपला | अपुला |
| १० | १३ | बेन | बेत |
| १० | २७ | सोनपुराहि | सोनपुरही |
| १२ | ७ | तुकोजी | तुकोजि |
| १५ | ९ | मनें करुन | मनें करून |
| २३ | २७ | दुःखाश्र | दुःखाश्रु |
| २४ | ४ | तीस | जीस |
| २४ | १५ | मह्येश्वरीं | महेश्वरीं |
| २६ | ११ | परिश्रम करूनी | श्रम बहु करुनी |
| ३७ | १० | गांठीं | गांठि |
| ४० | २ | प्राप्ती | प्राप्ति |
| ४१ | २३ | हेतु | हेतू |
| ४९ | ९ | सचिव | सचिवता |
| ६४ | १४ | मृक्तिका | मृत्तिका |

वा. का. १०४ ३६
२
३६
२

# श्रीमती देवी अहल्याबाई होळकर यांचें चरित्र.

( शार्दूल-विक्रीडित. )

श्रीसीतारमणा तसेंच नमितों त्या विश्वनाथा-प्रती ।
हे देवोत मला सुकाव्य करण्या बुद्धी ' अहल्या सती ' ॥
वाल्मीकादिक आद्य जे कवि तयां सर्वांस वंदूनि मी ।
मोरोपंत-कवीस वामन तुका इत्यादिकांना नमी ॥ १ ॥

पुण्य-श्लोक नलादि साधुवर या भूमी-वरी होउनी ।
गेले त्यापरि शुद्ध-कीर्ति अगदीं साध्वी अहल्या जनीं ॥
गेली होउनि गाजते बहु जिची सत्कीर्ति या भारतीं ।
वापी, घाट, जलान्न-दानसदनें ऐसी जिची सत्कृती ॥ २ ॥

देवाला भजणें, द्विजांस नमणें, गायींस सांभाळणें ।
पुत्राच्या-परि प्रेमयुक्त सकलां मानूनियां बोलणें ॥
सद्विप्रांस धनें, तशींच वसनें गो-दानही अर्पिणें ।
देवांगार सुनिर्मिणें कृति जिची स्वाद्वन्नही वाटणें ॥ ३ ॥

शास्त्री, पंडित वैदिकादिक द्विजा सन्मानुनी आदरें ।
विद्याऽऽचार बघूनि देत सकलां शालीं तशीं धोतरें ॥
देवी, साध्वि, सती जिला ह्मणुन हा भूलोक वाखाणितो ।
तीतें मी नमुनी तिच्या गुणगणां वर्णावया इच्छितों ॥ ४ ॥

आहे होळ ह्मणूनि एक अगदीं कुग्राम नीरा-कुलीं ।
त्यामध्यें परिवार घेउन सदा खंडू वसे चौगुला ॥
त्यानें जन्म महा प्रसिद्ध पुरुषा मल्हार-रावा दिलें ।
ज्यानें गाजवुनी स्वनाम जगतीं राज्यास संपादिलें ॥ ५ ॥

---

१ शोभायुक्त सीतारामाला २ महादेवाला ३ पवित्र आहे कीर्ति ज्यांची ते ४ विहिरी ५ पाणपोया व अन्नसत्रें ६ चांगली करणी ७ ब्राह्मणांस ८ चांगल्या ब्राह्मणांस ९ वस्त्रें १० देऊळ ११ गोडअन्न ( पक्वान्न ) १२ विद्या व वागणूक १३ गुणांच्या समुदायास १४ खेडें १५ नीरानदीच्याकांठीं १६ जगांत.

( स्रग्धरा. )

शेती-भाती करूनी उदरं[1]-भर करी खंडुजी, चौगुल्याला ।
एकाएकीं यमानें करुन अवकृपा गट्ट केलें तयाला ॥
त्याची कांता स्वभ्रात्या[2]-जवळ मग निघे जावया खानदेशा ।
मल्हारीचें स्वजीवा-सम अवनं[3] करी नित्य प्रार्थी गिरीशा ॥ ६ ॥

( इंद्रवज्रा. )

दुःखाऽऽकुला[4] माय निघे मुलाला ।
घेऊनि, गेहाप्रति[5] पातलीला ॥
भ्राता अशा त्या अपुल्या स्वसेला[6] ।
सांत्वूनि ठेवी स्वगृहीं तियेला ॥ ७ ॥

( स्रग्धरा. )

मेंढ्या मल्हारि राखी प्रति-दिवशिं खपे मायही शेतकामीं ।
ऐशा कष्टांत त्यांनीं बहुत दिन अहो कंठिले त्याच ग्रामीं ॥
एका मध्यान्ह-काळीं दिनकर[7] तपतां पूर्ण तीव्रां-करांहीं[8] ।
माता[9] वृक्षांतळाला भुजगवरं[10]-फणेखालतीं पुत्र पाही ॥ ८ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

गेली धांवत भोजजीस कथिली वार्ता[11], बहू घाबरी ।
पाहूनी भगिनी तसाच निघुनी तो ये भुजंगावरी ॥
घालावा जंव घाव तों अटपुनी सर्वांग नागें तिला ।
वल्मीकीं[12] शिरुनी मुला न डसुनी आनंद तेव्हां दिला ॥ ९ ॥
आज्ञा-पालन[13]-दक्ष शूर बरव्या भाचास त्या मातुलें ।
कंठाजीस दिलें हुशार करण्या युद्धामधें चांगलें ॥
मल्हारी बहु धीर-वीर बनण्या प्रारंभ हा जाहला ।
होता बारगिरी-वरी मग शिलेदारी पदा पावला ॥ १० ॥
बाजीराव तदा पित्र्यांसह[14] निघे दिल्लीवरी जावया ।
जातांना दिसला बहूत उमदा मल्हारि खासा तया ॥
हल्ला दिल्लिवरी करी प्रथम तैं तेथें लढे चांगला ।
याची युद्ध-कला बघूनि सकलो बाळाजि आनंदला ॥ ११ ॥

---

१ पोटभरणें २ आपल्या भावाजवळ ( भोजजीजवळ ) ३ रक्षण ४ दुःखानें व्याप्त ५ घरीं ६ बहिणीला ७ सूर्य ८ तीक्ष्ण किरणांनीं ९ मल्हाररावाची आई १० मोठ्या नागाच्या फडेखालीं ११ हकीकत १२ वारुळांत १३ आज्ञा पाळण्याविषयीं तत्पर १४ बापा-बाळाजीपंता-सह.

वा.काव्य ३८ 2



( स्रग्धरा. )

बाळाजी-पंत याचें बघुन बळ तसें शौर्य चातुर्य झाला ।
चित्तीं संतुष्ट भारी झडकरि मनसद्धार केलें तयाला ॥
स्वारांच्या पांचशांचा करुनि अधिपती[1] संगतीं ठेवुनी त्या ।
मल्हारी,'राव' तेव्हां मिळवुनि पदवी तोष दे मातृ-भ्रात्या[2] ॥१२॥

( शार्दूल-विक्रीडित. )

पूर्वीं दाय-बहादुरा यवनपें[3] त्या माळवीं नेमिलें ।
होतें, त्यांत शिरून त्यास निकरें युद्धार्थ बोलाविलें ॥
आज्ञा युद्ध करावयास दिधली तैं पेशव्यानें[4] तया ।
मल्हारी मग थोर युद्ध करुनि कीर्तीहि पावे जया ॥ १३ ॥
होता शूर खरा रणाविण दुजा दायाँ[5] दिसेना बरा ।
रस्ता स्वस्थपणें निघूनि सकलीं[6] जाया यमाच्या घरा ॥
श्रीमंतें करुनी कृपा मग सुभा बक्षीस मल्हारिला ।
देवोनी तहशील-दार-पदवी मल्हारबा वानिला ॥ १४ ॥
ही वार्ता सुखदा[7] जनांत पसरे, मामास मातेस ती ।
ऐकोनी अतितोष[8] होउनि तदा देवास तीं प्रार्थिती ॥
" देवा थोर कृपा करून गरिबां सौख्यामधें घातलें ।
बाळा देउनि आयु[9] पूर्ण करवीं सत्कृत्य[10] तूं चांगलें " ॥१५॥

( स्रग्धरा. )

मामाला एक कन्या सकल-गुणवती प्रौढ[11]ही अंबुजाक्षा[12] ।
तेजस्वी धैर्यशाली धनगर असुनी सद्म[13]-कृत्यांत दक्षा[14] ॥
नामें जी गौतमा ती नव-नृपति[15] अशा मातुलें[16] भागिनेया[17] ।
देऊनी तुष्ट केली सतनय[18] भगिनी आणखी आत्मजाया[19] ॥ १६॥

( गीति. )

समरोत्सुका[20]ही जाया[21], समरोत्साह्यास लाभली बरवी ।
विजयीं उत्साह करी, अजयीं[22] पतिला लढाइला फिरवी ॥१७॥
मोठें राज्य मिळालें, पूर्व-वयीं फार भोगिली विपदा[23] ।
तरि चैनी नच झाला, मल्हारी रंजवी प्रजेस सदा ॥ १८ ॥

---

१ धनी २ मामाला ३ बादशहानें ४ बाळाजीपंतानें ५ दायबहादुरास ६ सगळ्यांनीं ७ सुखदेणारी ८ फार आनंद ९ आयुष्य १० चांगलें काम ११ पोक्त १२ कमलनयना १३ गृहकृत्यांत १४ चतुर १५ नवा राजा १६ मामानें १७ भाचाला १८ मुलासह १९ आपली बायको २० लढाईची उत्सूकता असलेली २१ बायको २२ पराभव झाला असतां २३ दुःख.

सरल!

प्रभु पेशव्यास युद्धा,-मध्यें साह्यार्थ जो सदा टपला ।
जपला प्राणाहुनिही, बाजीरावा तसेंच रयतेला ॥ १९ ॥
झाला पुत्र तयाचें, खंडोबा ठेवुनी दिलें नाम ।
स्मारक[1] स्थापित्याचें वा, कुल-देवाचेंच हें असें नाम ॥ २० ॥
ज्या देवीचें आह्मी, नमुन तिला सांगतों चरित्र भलें ।
भावी पति खंडोबा, सकलांला मान्य युग्म[2] हें झालें ॥ २१ ॥
स्व-सुत[3]-मुखाला पाही, मल्हारी नंद जेविं कृष्णाच्या ।
दशरथ रामाच्या वा, जन्में आनंदला स्वतनयाच्या ॥ २२ ॥

( अहल्या-पति-जनन नामक प्रथमांक समाप्त. )

---

## द्वितीयांक प्रारंभ.

### अहल्या जनन.

( आर्या. )

श्री-एकनाथ-जन्में, पैठण आळंदि ज्ञानरायानें ।
आली प्रख्यातीला[4], तैशी पाथर्डि या अहल्येनें ॥ १ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

हल्लीं पाथरडी जनांस सकला कुग्राम ऐसी दिसे ।
ती पूर्वी रमणीय[5] धान्यसहिता[6] संपत्तियुक्ता[7] असे ॥
श्रीमंतें वसवूनि पेठ बरवी तैं फौजही ठेविली ।
त्या-योगें नगरासमान गमुनी लोकां दिसे चांगली ॥ २ ॥
गांवा-भोंवतिं लांबलांब कुरणें[8] होतीं तृणांचीं अती ।
त्यामध्यें फिरती यथेच्छ चरती गो-वत्स[9] यांच्या ततीं[10] ॥
विप्रांचीं सदनें[11] बरींच असुनी गांवांत देवालयें ।
होतीं, शोभविलें तया नगरिला तैसेंच विद्यालयें[12] ॥ ३ ॥

( आर्या. )

आनंदराव शिंदे, धनगर होता तया पुरी-मध्यें ।
साध्वी भार्या त्याची, तो वागे साधुसा जना-मध्यें ॥ ४ ॥

---

१ आठवण देणारी कृति २ जोडपें ३ आपला मुलगा ४ प्रसिद्धीला ५ सुंदर ६ धान्यानें युक्त ७ धनानें युक्त ८ गवतांचीं ९ गाई व वासरें १० रांगा ११ घरें १२ शाळेनें.

काव्य
३२८

(पृथ्वी.)

सदा विमल[१] मानसीं[२], रत[३] परोपकारीं सदा ।
सदास[४] करुनी श्रमा पिकवि शेत तो, आपदा ॥
कदा न शिवली जया धनगरांत मान्याग्रणी[५] ।
सदार[६] सुख-युक्तही असुनि तुच्छ सौख्या गणी ॥ ५ ॥

(शार्दूल-विक्रीडित.)

भार्या प्रेमयुता, घरीं सकलही वस्तू बरी शेतकी ।
विश्वेशीं मन, मान्य जे सुजन त्या, नाहीं परी सौख्य कीं ॥
त्याला पितृजनां[७] निर्वाप[८] तिथिला[९] द्याया नसे संतती ।
त्या-योगें बहु खिन्न तीं उभयतां देवा सदा प्रार्थिती ॥ ६ ॥
त्याची स्त्री बहु सावधान[१०] चतुरा साध्वीहि होती खरी ।
संतानाविण मानसीं तळमळे यात्राहि भारी करी ॥
मुंजाबास प्रदक्षिणा करुनिही मल्हारि जेजूरिचा ।
सायासा नवसा करून सुखवी हेतू पुरेना तिचा ॥ ७ ॥

(स्रग्धरा.)

सर्वांगीं राख ज्याच्या बहुत असति ज्या कंठिं रुद्राक्षमाला ।
कक्षे भिक्षार्थ झोळी, असुनि नवजटाजूट[११] तो मस्तकाला ॥
गोसावी एक ऐसा नशिब उघडतां, पातला सुस्वभावें ।
अन्नेच्छा[१२] तृप्त त्याची करून सुखविला साध्विनें देवभावें ॥ ८ ॥
गोसावी तुष्ट झाला, वदत मग तिला " माय इच्छा कशाची ।
आहे ती स्पष्ट सांगा" नमुनि पद सुधी संतती-लागिं याची ॥
स्वामी[१३] देऊनि रक्षा[१४] " पुरविल तुमची देव इच्छा भजा जा ।
भावें सेवा करोनी करवीर-नगरीं[१५] देविला तोषदा जा " ॥ ९ ॥
ऐसी आज्ञा करूनी निघुन झडकरीं जाय तो भिक्षु वेगें ।
कांता[१६] हें वृत्त येतां प्रियकर पतिला फार हर्षेंच सांगे ॥
तेव्हां आनंदरावा बहुत प्रमद[१७] तो होय कोल्हापुराला ।
जायाला सिद्ध झाला सुदिनें[१८] बघुनि तो योग्य[१९]-काळीं निघाला ॥ १० ॥

---

१ निर्मल २ मनांत ३ गर्क ४ चाकरासह ५ मान्यजनातमुख्य ६ बायकोसह ७ पितरांना ८ तिलांजळी ९ श्राद्धतिथीला १० सावध ११ नवीन जटांचा फेटा १२ क्षुधा १३ गोसावी १४ अंगारा १५ कोल्हापुरांत १६ बायको (आनंदरावाची) १७ आनंद १८ चांगला दिवस १९ मुहूर्तावर.

( शार्दूल-विक्रीडित. )

गेलें भाविक जोडपें करविरीं सेवावया देविला ।
तेथें राहुन एक वर्ष करुनी सेवेस त्यांनीं तिला ॥
केलें तुष्ट ह्मणून स्वप्न-समयीं दृष्टांत रावा[1] भला ।
झाला कीं "उदरीं तुझ्या जनु[2] स्वतां मी घेत आहे" चला ॥ ११ ॥

( स्रग्धरा. )

" सेवेनें तुष्ट झालें परत निघुन जा आपुल्या तूं घराला ।
येतें पोटीं तुझ्या मी" कथुनि मग शिवा[3] गुप्त झाली; सतीला ॥
ऐसें आनंदें[4] सांगे श्रवण करवि तो आपल्या बायकोला ।
विप्रांचा संघ[5] त्यानें धन, वसन, तदा देउनी तोषवीला ॥ १२ ॥

( शार्दूल-विक्रीडित )

" कोणी एक सुवासिनी सतनया[6] माझ्याकडे येउनी ।
भाळीं कुंकुम लावुनी मुलगिला ओटीमधें घालुनी ॥
झाली गुप्त" असें तदा स्व-पतिला स्वप्नास सांगे सती ।
स्वप्नांनीं परिपूर्ण हेतु गमुनी आले घरा दंपती ॥ १३ ॥
विप्रां भोजन श्री-फलांसह[7] खणां विप्रस्त्रियांनां दिलें ।
अंधाऽपांग[8] जना शिधा सकलही आप्तां जनां चांगलें ॥
देई भोजन तोष पावुनि मनीं राहे बहु प्रीतिनें ।
ती, झाली मग गर्भिणी पतियुता[9], उत्साह केला तिनें ॥ १४ ॥
होता मास पुरे प्रसूत मग ती झाली, सु-कन्या तिला ।
पूर्णेंदूसम[10] तेजयुक्त बघुनी आनंद आनंदला ॥
पूर्वीं सूर्य-कुलावतंस[11] नृपती पुत्रार्थ सेवा जशी ।
धेनूंची[12] करुनी अपत्य[13]-सुख घे याची कृतीही तशी ॥ १५ ॥
त्या वेळीं नगरांहुनी[14] धनगरें ज्योतिर्विदां[15] आणिलें ।
कन्येच्या टिपणास त्यास लिहिण्या-लागीं तदा प्रार्थिलें ।
त्यानें वर्तवुनी ग्रहांस लिहिली तत्पत्रिका बोलिली[16] ।
ऐकूनी सकला[17] तया द्विजवरा अत्यादरें पूजिला ॥ १६ ॥

---

१ आनंदरावाळा २ जन्म ३ देवी ४ आनंदराव ५ समुदाय ६ मुलीसह ७ नारळासह ८ व्यंग ९ पतीशीयुक्त १० पूर्णचंद्रासारखी ११ सूर्यकुलांतील मुकुटमणी दिलीपराजा १२ कामधेनूची १३ संतानसुख १४ अहमदनगराहून १५ ज्योतिष्याला १६ वाचिली १७ सगळी.

( स्रग्धरा. )

ऐकाहो पत्रिका ती "सकल जन हिशीं मातृ-प्रेमा धरून।
सन्मानें वागणूका करतिल, इजला एक राजा वरून ॥
रा[2]ज्ञी खाशी करूनी रमविल प्रमुदें, ही पुढें तोषवील।
औदार्यें दानधर्में सकल वसुमती तुष्ट भारी करील" ॥ १७ ॥

( आर्या. )

बारा दिन झाले तैं, थाटाचें बारसें बहू केलें ।
ठेवुनि नाम अहल्या, घुगऱ्यांनीं बांधवां सुखी केलें ॥ १८ ॥
ती कन्या वर्षाची, झाल्यावर चालण्यास जैं लागे ॥
तैसेंच बोलण्याला, झाले ते[3] हर्षचित्त त्या योगें ॥ १९ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

सौंदर्यें रतिच्यापरी जरि नसे, तेजस्वि होती सुता ।
नेत्र[3]-घ्राण तशीं दुजीं सकल-ही तीं इंद्रियें पाहतां ॥
भारी मोद मना जनास सकला देई अहल्या भली ।
तन्माता बघुनी हिच्या बहुविधा लीलांस आनंदली ॥ २० ॥

( आर्या. )

पिंपळपान कपाळीं, हसळी शोभे गळ्यामध्यें बरवी ।
हातांत बिंदलीला, घालुनि माता तिला बहू सजवी ॥ २१ ॥

झाली दिगंत कीर्ती, साध्वीच्या ज्या गुणां-मुळें जगतीं ।
औदार्यादि गुण तिचे, पंचम वर्षीहि चांगलें दिसती ॥ २२ ॥

ती पोर मैत्रिणीशीं, प्रेमानें वागुनी तयां सुखवी ।
कांहीं पदार्थ खाया, मिळतां सर्वांस वांटुनी देई ॥ २३ ॥

पोरपणीं खेळ तिचा, आवडता मांडुनी दगड एक ।
त्याची पूजा करणें, तद्भजनें ती दणाणवी चौक ॥ २४ ॥

मधुर तसें सत्य सदा, सर्वांशीं बोलणें अहल्येचें ।

---

१ आईवरील माया २ राणी ३ अहल्याबाईचे आईबाप ४ आनंदित आहे चित्त ज्यांचें असे ५ मदनस्त्रीसारखी ६ नाक ७ त्याच्या भजनानें.

कोणी असत्य वदतां, भाषण तिजशीं मुळीं न होत इचें ॥२५॥
या सद्गुणांमुळें ती, सर्वांना फार फार प्रिय बाळा[1] ।
झाली, सदैव जवळीं इच्छिति जन ती मनोहरा बाळा[2] ॥ २६ ॥
पंतोजि मित्र होता, आनंदाचा घरा-जवळ शाला ।
होती, तो अनपत्य[3]चि, सांभाळी नित्य प्रीतिनें इजला ॥२७॥
त्या गुरुवरतीं पितरां,-पेक्षां माया बहू करी बाला ।
शिकवी वाचायाला, क्षण न विसंबे गुरूहि तो तिजला ॥२८॥
भारत रामायण त्या, पंतोजीला असे पुरें पाठ ।
तो तीस कथा सांगुनि, करवी कविताहि कांहिं मुखपाठ ॥२९॥
सत्व हरिश्चंद्राचें, सीतेचें प्रेम आपल्या रमणीं ।
तैसा वनवास तिचा, तिजकरवीं ऐकवी कुलीनमणी[4] ॥ ३० ॥
दमयन्ती लग्नोत्सव, ती सावित्री पती कसा उठवी ।
अज्ञात-वास[5] सति[6]चा, सांगुनि दुःखार्त[7] मृत्यु-भू ठसवी ॥३१॥

(अहल्या-जनन-नामक द्वितीयांक समाप्त.)

---

## तृतीयांक प्रारंभ.

### अहल्या विवाह.

(शिखरिणी.)

तुझी कन्या एका नृपति- तनया[9]तें वरुन ही ।
सुखातें पावोनी करिल सुख-युक्तां[10] बहु मही ।
असें नक्षत्रज्ञें[11] जरिहि जनकाला सुचविलें ।
तरी त्यानें आप्तां[12]-प्रति वर बघाया फिरविलें ॥ १ ॥
परी त्यांचे गेले फुकट अगदीं यत्न सगळे ।
नदी-संयोगाला जलनिधि[13] असावा नच तळें ॥
ह्मणोनी ते सारे धनगर तदा स्वस्थ बसले ।
वर-प्राप्ती[14]-साठीं सकलसुरदेवा[15] नवसिलें ॥ २ ॥

---

१ बाप जो आनंदराव त्याला २ कन्या ३ संतान नसलेला ४ चांगल्या कुलां-तील व श्रेष्ठ ५ विराटाचे घरीं गुप्त राहाणें ६ द्रौपदीचा ७ दुःखानें भर-लेली ८ मृत्युलोक ९ राजपुत्राला. १० सुखी ११ ज्योतिष्यानें १२ सोयऱ्या-धायऱ्यांस १३ समुद्र १४ नवरा मिळण्यासाठीं १५ परमेश्वराला.

वा. काव्य ३२



( शार्दूल-विक्रीडित. )

ज्यानें जन्म दिला मुलीस वरही त्या ईश्वरें पाहुनी ।
ठेवूनी दिधला असेल ह्मणुनी केलें विचारा मनीं ॥
राघोबासमवेत शूर[1]-वर त्या मल्हारबाचा पडे ।
जेव्हां हो तळ थोर पाथरडिला तेव्हां पती सांपडे ॥ ३ ॥
होता एकच शूर-धीर-वरही[2] मल्हारबाला सुत ।
संगें घेउनि त्यास नित्य शिकवी राज्यर्द्धिचें[3] हृद्गत ॥
अंगानें दृढ नाद त्यास बरवा त्या पारधीचा असे ।
त्या-योगें बहुतोष तो कधिं कधीं शाहूसही देतसे ॥ ४ ॥
लंगोटा चढवूनि तंग वरतीं काचा कसी तो गडी ।
काढी दंडें उदंड पेलुनि बहू जोड्या करी पक्कडी ॥
घोडा धांवत सोडुनी सकलही पैजा सुतें जिंकिल्या ।
पुत्रा युद्ध-विशारदा बघुनि त्या मातोश्रि आनंदल्या ॥ ५ ॥

( स्रग्धरा. )

खंडूचें लग्न आतां लवकर करणें प्रार्थिलें गौतमीनें ।
भर्त्याला फार प्रेमें परि वधु बघण्या यत्न केला न त्यानें ॥
सैन्याच्या सुव्यवस्थेप्रति करुन मुदें बैसले लोक कांहीं ।
गप्पा गोष्टी कराया नरमृगपति तो पेशवा आणि हाही ॥ ६ ॥
शिष्यांना सोडुनी तो गुरुवर[11] तिथला पेशव्या-भेटण्याला ।
आला तैसाच बैसे रघुपति-जवळी[12] गोष्टि ऐकावयाला ॥
श्रीमंतोक्तीस[13] माना डुलवुनि करुनी हास हो चाललेल्या ।
तों तेथें येउनी ती गुरुजवळ बसे स्वस्थ-चित्तें अहल्या ॥ ७ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

गोरीपान नसे तरी मुख तिचें होतें बहू चांगलें ।
श्रीमंतादिक सर्व तीस बघुनी चित्तांत संतोषले ॥
त्यांनीं सर्व हकीकतीस पुसिलें पंताजि सांग कथा ।
श्रीमंतासह राव[14] तो बहु तदा आनंदला सर्वथा[15] ॥ ८ ॥

---

१ पराक्रम्यांत श्रेष्ठ २ शूर व धैर्यवान यांच्यांत मुख्य ३ राज्य वाढविण्याचें ४ इंगित ५ जोर ६ मल्लखांबा-वरच्या पक्कडी ७ युद्धांत चतुर ८ गौतमाबाई ९ नवरी १० पुरुषश्रेष्ठ ११ गुरुश्रेष्ठ १२ रघुनाथरावाजवळ १३ श्रीमंत पेशव्याच्या बोलण्यास १४ मल्हारराव १५ सर्वप्रकारें.

खंडूला बहु योग्य ही वधुअसे मल्हारबा बोलला ।
श्रीमंतासहि मान्य होउन पुढें खंडूहि बोलाविला ॥
'व्हावी काय मुला तुला वधु बरी' सत्प्रश्न हा ऐकला ।
'सुज्ञांचे सुविचार मान्य मजला' खंडू तदा बोलला ॥ ९ ॥
पंतोजी-करवीं तया अणवुनी आनंदरावा पुसा ।
हेतू हा तुजला असे मत बरा किंवा तुझा तो कसा? ॥
'मी आहें प्रभु दास योग्य आपला व्याही नसे व्हावया ।
कन्येचें बहु भाग्य वा शिवकृपा' तोही वदे मान्य या ॥ १० ॥

(आर्या.)

श्रीमंत-मता तो घे, विप्राकरवीं सुपत्रिका पाही ।
ऐकुनि हर्षित होई, उत्सव करण्यांत गुंतला व्याही ॥ ११ ॥
साखर-पुडाहि दिधला, लग्नोत्सव पुण्य-पत्तन-स्थानीं ।
धरुनि तिथी सन्निधची, करण्याचा बेत ठरविला त्यांनीं ॥ १२ ॥
आनंदराव कन्ये-सह, मग येऊनि सकल भार्येला ।
वृत्तांत घरीं ऐकवि, नच मावे हर्ष तो तदा तिजला ॥ १३ ॥

(स्रग्धरा.)

आनंदा तें वऱ्हाडी जमवुनि सगळे घेउनी शिक्षकाला ।
सामानाच्याहि गाड्यां-सह मग निघुनी पुण्यग्रामांत आला ॥
इंदूराच्या अधीशें नृपति-वर दुजे उत्सवीं आणण्याला ।
आमंत्राया तुकोजी सुविनय-नत त्या धाडिलें भ्रातृजाला ॥ १४ ॥

(आर्या)

जयपूर उदेपुर तें, बस्तर धामी तशीच कुंभेरी ।
ग्वाल्हेर बडोद्याला, तैसें आव्हान जात क्षेसूरीं ॥ १५ ॥

(शार्दूल-विक्रीडित.)

झालांवाड थिआक जावल टिखा कोचीन बुंदी डुबा ।
कोटा भावलपूर ईदर तसें तें झिंद नाभाहि बा ॥
लाहारू बिकनीर सोनपुरहि गोद्रा कुनीयारपा ।
नालावार तिरोज बादलपुरा तैसें दुजाही नृपा ॥ १६ ॥

---

१ चांगला सवाल २ सूज्ञ जे आपण त्या आपले ३ मान्य ४ महाराज ५ पुण्यास ६ जवळची ७ बायकोला ८ विनयानें नम्र ९ पुतण्याला १० आमंत्रण ११ यांतील बहुतेक संस्थानें उत्तरहिंदुस्थानांत आहेत.

बा. काव्य ३६/२



३६

( स्रग्धरा. )

मल्हारी मित्र होता, ह्मणुनि नरपती पातले लग्नकार्या ।
सर्वांचा संघ[1] मोठा जमुनि गजबजे फार तें ग्राम[2] आर्या[3] ॥
वाजंत्री वाजती हो अभिनय[4] करुनी वारमुख्यांगना[5] त्या ।
सर्वांच्या मानसाला[6] रमवुनि करिती सुस्वरें गान नृत्या ॥१७॥

( आर्या. )

श्रीमंत शाहुराजा, देउनि बहुमान त्या परिजनाला[7] ।
उल्हासें आला तें, मल्हारीलाहि हर्ष बहु झाला ॥ १८ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

मोठा मांडव त्या वितानें[8] बरवें त्या भोंवतीं झालरी ।
हंड्या झुंबर गोलकादि[9] खचले हो मौक्तिकांच्या सरी ॥
मोठीं घालुनि जाजमें वर[10] भले मोठेच ते गालिचे ।
गाद्या लोड बिछावले नरपती तैं बैसले देशिंचे ॥ १९ ॥

( स्रग्धरा. )

शाहू उच्चासनीं[11] तो नृपति-वर दुजे बैसले त्याजपाशीं ।
डाव्या बाजूस बैसे प्रतिनिधि दुसरी मंडळी आणि खाशी ॥
एका बाजूस राजे करभर[12] नमनें अर्पिती सालसाला ।
ते होते बैसलेहो वधुवर बघुनी हर्ष सर्वांस झाला ॥ २० ॥

( आर्या. )

खंडोबानें कंठीं, कंठा घालूनि मौक्तिकांचा तो ।
शिरपेंच पगडिवरतीं, दिसला मदनासमान साचा तो ॥ २१ ॥
मस्तकिं भर-जरि पगडी, तैशी पायांत ती तुमान बरी ।
भरजरिचा अंगरखा, मणि-युत[13] कटकांस[14] घातलें स्वकरीं ॥२२॥
मंगल-विधि करण्याला, त्यांना लग्नगृहांत मग नेलें ।
तेथें समंत्र विप्रें, विधि करुनी ' सावधान ' ही केलें ॥ २३ ॥
मोठ्या थाटानें ती, वरात नगरांत मिरवुनी तेथें ।
येऊनि शाहु-पायीं, ठेविति सुकुमार-दंपती माथें ॥२४ ॥

---

१ समुदाय २ पुणें ३ हे श्रेष्ठ मनुष्या ४ हावभाव ५ श्रेष्ठ नायकिणी ६ मनाला ७ चाकराला ८ छत ९ गोळे वगैरे १० जाजमावर ११ उंच सिंहासनावर १२ खंडणी १३ रत्नखचित १४ कड्यांना.

अनपत्य[1] शाहुराजा, मोठ्या प्रेमें वधूवरास स्वयें ।
उत्संगीं[2] घेउनि त्या, घाली मग शर्करा[3] मुखां-मध्यें ॥ २५ ॥
सस्त्रीक[4] खंडुजी हा, मेळ्या राखीत जो बसायाचा ।
शाहूत्संगीं[5] परि तो बसला हा खेळ सत्य नशिबाचा ॥ २६ ॥
शाहू नंतर दुसऱ्या, मानकऱ्यांनींहि घातली सुमुखीं[6] ।
उत्साहें साखर ती, त्या-योगें फार हर्षली सुमुखी[7] ॥ २७ ॥
इकडे तुकोजी-रायें, हार तुरे आणि तांबुलां दिधलें ।
अत्तर गुलाबपाणी, गणिका[8]-करवीं सुनृत्यहीं[9] केलें ॥ २८ ॥
शाहूराजा मग नृप, दुसरे गेलेहि मंडपांतून ।
तेव्हां बक्षिस घेउन, गेले वारांगनादि[10] तेथून ॥ २९ ॥
दुसरे दिवशीं त्यानें, थोर दिली मेजवानि राजांना ।
मानादि[11] व्यवस्थेला, झाला आनंद पाहुनी त्यांना ॥ ३० ॥
राजे निरोप घेउन, गेले स्वस्थानिं आपल्या वेगें ।
मल्हारी जेजुरिला वोहरें[12] घेऊनि पातला संगें ॥ ३१ ॥
कुल-दैवत खंडोबा, तत्पद[13]-कमलीं मुलांस लोळविलें ।
घेउन प्रसाद त्याचा, विप्रां द्रव्यादिकेंहि[14] तोषविलें ॥ ३२ ॥
श्रीमंताज्ञा[15] घेउनि, गेला मल्हारि माळवा-देशीं ।
इंदूर-नगरिं झाली, पाहुनि सानंद[16] ती प्रजा त्याशीं ॥ ३३ ॥
ज्योतिर्विद-कथनापरि[17], कन्येला नृपति लाधला वर जैं ।
आनंद[18] बायको-सह, आनंदोदधिमधें[19] बुडाला तैं ॥ ३४ ॥
परि कन्यासुख[20] बघण्या, मृत्यूनें ठेविला न हा जोडा ।
नश्वर[21] सुख-दुःखें हीं, पाहुनि संसार-पाश हा तोडा ॥ ३५ ॥

**(अहल्या-विवाह-नामक तृतीयांक समाप्त.)**

---

१ मूल नसलेला २ मांडीवर ३ साखर ४ बायकोसह ५ शाहूच्या मांडीवर ६ सुंदर वदनांत ७ सुवदना ८ नायकिणी ९ चांगला नाच १० नायकिणी वगैरे ११ मानपान वगैरे १२ वधुवर १३ त्याच्या पायावर १४ धन वसनें वगैरेंनीं १५ पेशव्याचा हुकुम १६ आनंदित १७ ज्योतिष्याच्या सांगण्याप्रमाणें १८ आनंद राव १९ आनंद-समुद्रांत २० कन्येचा सुख सोहळा २१ नाश पावणारी.

# चौथा अंक.

## संसारसुख

( शार्दूल-विक्रीडित. )

कोणी एक प्रवास निर्जन वनीं जेव्हां कराया निघे ।
जातां ताप तयास दुःसह असा होई रवींचा[1], बघे ।।
विश्रांतीस्तव त्यास एक सहजीं छायाम्रही[2] सांपडे ।
वापी संनिध पाहतां मग रमे विश्रांति घ्याया पडे ।। १ ।।
संसाराटवि[3] दुःखदा[4] परि कधीं होतो सुखाऽऽभास ही ।
तैसा भास महासतीस गमला वर्षें दहा खास हीं ।।
लग्नानंतर सासरीं वसुन ती श्वश्रूश्वशूरां-प्रती[5] ।
आज्ञा पाळुनि तोष-युक्त[6] करुनी नांदे सुखानें सती ।। २ ।।
होत्या ज्या नणदा तयांवरि करी प्रेमा स्वसे-सारखा[7] ।
ऐशा सद्गुणि रायकोस कधिंही नाहीं पती पारखा ।
ऐशीं पांच सुवर्तसें[8] निघुनि हो जातां ऋतु-प्राप्तिला
होतां थोर महोत्सवास करुनी मल्हारबा तोषला ।। ३

( स्रग्धरा. )

सावित्री स्वश्वशूरा वनगत असतां पूर्ण सेवा करून ।
आनंदा नित्य देई प्रियकर वदुनी आत्मकांतास[9] मान ।।
तैशी मल्हारबाची प्रतिदिवशिं बहू चाकरी सन्मनानें[10] ।
केली याही सुनेनें प्रमुदित[11] पति तो होय या वर्तनानें ।। ४ ।।

( वसंत-तिलका. )

मल्हारबा निघत जैं करण्यास आजी[12] ।
साध्वी सुनेस विजयाऽजय काय आजी[13] ।।
ऐसें पुसेच वदतां ‘ विजया मिळेल ’ ।
तेव्हां प्रयाण करण्यास धजे नृपाल ।। ५ ।।

( आर्या. )

आत्म स्नुषामिषानें[14], हीं विजयश्रीच[15] मूर्तिमान वसे ।
येऊनि घरीं माझ्या, मल्हारीला सदैव वाटतसें ।। ६ ।।

---

१ सूर्याचा २ छायायुक्त आंब्याचें झाड ३ संसाररूप अरण्य ४ दुःखदेणारें ५ सासूसासऱ्याला ६ आनंदित ७ बहिणीप्रमाणें ८ वर्षें ९ आपल्या नवऱ्यास १० मनापासून ११ आनंदित १२ लढाई १३ आज १४ सुनेच्या रूपानें १५ विजयरूप लक्ष्मी.

( स्रग्धरा. )

पत्नी मल्हाररावाची, बहुत कडक ती गौतमाबाइ होती ।
खंडोबाची सुरामा[1] बहुत चतुरता सासुला दाखवी ती ॥
सेवोनी तुष्ट ठेवी प्रति-दिवशिं तिचे पाय वंदी प्रमोदें ।
आज्ञा पाळोनि साची वदवि गरिबही सून माझीच मोदे[2] ॥ ७ ॥

( आर्या. )

खंडोबाच्या भगिनी, हरकू-बाई दुजी उदाबाई ।
असतां माहेरीं ही,[3] प्रेमें वागूनि तोष त्या देई ॥ ८ ॥
जिवलग मैत्रीण अशी, नणदांना जाहली अहल्या ही ।
लिहिण्यास वाचण्याला, शिकवुनि त्यांना प्रमोदें[4] बहु देई ॥९॥
होते दास तशा त्या, दासीही फार या अहल्येला
परि त्या दास-जनांला, दुर्वचनें[5] त्रास लेश[6] नच झाला ॥१०॥
" साध्वी-सती-अहल्या, होउं शतायू[7] " असें प्रभू-पाशीं
प्रार्थिति सदैव दासी, या योगें तोष होइ बहु इजशीं ॥११॥

( स्रग्धरा. )

ताराचा चौघडा जैं घडघड करण्या लागतो तैं उठावें ।
देवाचें नांव घ्यावें मग विधि करुनी[8] स्नान ही स्वच्छ व्हावें ॥
प्रेमानें बाळकृष्णा पुजुन तुळसही पूजुनी भक्तिभावें ।
घाली फेऱ्या तियेला दर दिवस तिचा घालवी ती स्वभावें ॥१२॥

( आर्या. )

सासू श्वशूर कधिं कधिं, हांसत रागें हि भरत थट्टेनें ।
भोळेपणा बघुनि हा, परि सत्कर्म[9] सोडिला नसेच हिनें ॥१३॥
सेवक[10]जनांकडूनी, तैसी पितरांकडून[11] भार्येची ।
स्तुति ऐकुनि आनंदें, खंडोबा मानि रत्नखनि[12] साची[13] ॥१४॥
संयोगें[14] पत्नि-पतिचा[15], करणारा समय पातला पतिनें ।
सुख दिधलें बहु इजला, हीहि तया रमवि फार प्रेमानें ॥१५॥

---

१ सुंदर स्त्री २ आनंद पावत असे ३ अहल्याबाई ४ आनंद ५ दुर्भाषणानें ६ किमपि ७ शंभर वर्षे वाचणारी ८ प्रातर्विधि ९ चांगला परिपाठ १० चाकरमाणसांकडून ११ आईबापांकडून १२ रत्नांची खाण १३ खरोखर १४ मिलाफ १५ नवरा बायकोचा.

[library stamp]

( शार्दूल-विक्रीडित )

गर्भाधान-दिनीं महाल सगळा शृंगारला, त्या स्थळीं ।
हस्तीदंति पलंग त्यावरि, महाशय्या[1] असे घातली ॥
पुष्पांचा रमणीय[2] वास[3] सुटुनी चित्ता बहू तोषवी ।
खंडोबा सतिला करीं धरुनिया मोदें वरी[4] बैसवी ॥ १६ ॥

( आर्या )

लग्ना-पूर्वींच हिनें, सीतादि सतिचें चरित्र खोदून ।
हृदयीं ठेवून दिलें, होतें वागे तयास ती धरुन ॥ १७ ॥
स्त्रीचें दैवत पति हें, काया वाचा मनेंकरुन तया ।
सुखवावें धर्म असा, साध्वींचा[5] नित्य मानि ती सदया[6] ॥१८॥
आज्ञा सदैव पाळी, पतिचें झाल्यावरीच भोजन ती ।
जेवी बहु आनंदें, सासूला सासऱ्या करी प्रणती[7] ॥ १९ ॥
मृगया[8] करीत असतां, तत्पतिला[9] कधिं कधीं दुपार टळे ।
तद्भोजनां[10]-विना तरि, जलपानाच्या[11]-कडेहि मन न वळे ॥ २० ॥
साध्वी पतिव्रता स्त्री, ज्यानां मिळते जगांत तेच सुखी ।
खंडोबा सुख द्याया, शब्द तिचा नित्य प्रीतिनें राखी ॥ २१ ॥
सुशील दंपति[12] ऐसें, प्रेमाची वृद्धि ती करायाला ।
झटतां दों वर्षांनीं, प्रेमांकुर[13] लागला दिसायाला ॥ २२ ॥
झाली प्रसूत देवी, पुत्राला मालिराव नांव दिलें ।
अत्यंत प्रेम आजा, आजी यांचें मुलावरी बसलें ॥ २३ ॥
जातां पति युद्धाला, ती साध्वी त्या सुताकडे बघुन ।
कंठी वियोग-दिनहो, पूजन-भजनादि भक्तिनें करुन ॥ २४ ॥
लावण्य आणि गुणहो, मातेचे घालुनी मुलीमाजीं ।
विधिनें[14] कन्या ऐसी, दिधली त्यानां सुखाप्रती दे जी ॥ २५ ॥
मुक्ताबाई दिधलें, नांव करी प्रेम माय[15] तिजवरती ।
पतिला मुक्त करूनी, जीहि स्वयें मुक्तिपावली सुसती ॥२६॥

---

१ मोठा विछाना २ मनोहर ३ सुगंध ४ पलंगावर ५ पतिव्रतेचा ६ दयाळु ७ नमस्कार ८ पारध ९ तिच्या नवऱ्याला १० तो जेवल्याशिवाय ११ पाण्याचा घोट घेणें १२ सुस्वभावी जोडपें १३ प्रेमाचा अंकूर ( गर्भ ) १४ ब्रह्मदेवानें १५ आई ( अहल्याबाई )

( शार्दूल-विक्रीडित )

संसारीं सुख व्हावयास जगतीं जीं जीं जना साधनें ।
व्हावीं तीं सगळींच लब्ध तिजला[1] देवा भजे सन्मनें[2] ।।
सासू प्रेम मुली-परी तिजवरी तो सासराही करी ।
कन्या, पुत्र, पती अखंड धनही बाई[3] सुखी ही खरी ।। २७ ।।

( आर्या. )

बाळपणीं पितरांनीं[4], तरुण-पणीं पति-सुतादिकीं[5] दिधलें ।
तें सुख नष्टचि झालें, ईशे स्त्रीरत्न-हें कसीं[6] धरिलें ।। २८ ।।
दुःखद[7] कथा पुढें ही, श्रवण करावी ठसेल सद्बोध[8] ।
चंदन स्वयें जळे तरि, गंधें सुखवी जना करी बोध ।। २९ ।।

**अहल्या-संसार-सुख नामक चौथा अंक समाप्त.**

## अंक ५ वा.

### पतिनिधन.

( वसंत-तिलका. )

श्रीमान शूर अथवा सदसद्विचारी[9] ।
चातुर्य-युक्त[10] परमेश्वरिं भार भारी ।।
ऐशा नरा यम धरी स्वपुरास न्याया ।
लज्जा नसे किमपि कांय ह्मणूं यमा या ।। १ ।।

( शार्दूल-विक्रीडित. )

पोर्तुगीज निजाम शूर रिपुंची[11] मोडूनिया खोडकी ।
दिल्लीचा[12] पति तोहि हस्तक[13] असा राही नसे तोड कीं ।।
राजस्तानपती[14] करून सगळे सामंत[15] त्यानें[16] तदा ।
शिंदे, होळकरादि ते बनविले सेवेकरी हो सदा ।। २ ।।
ऐसा थोर हिऱ्यापरीच चमके तो पेशवा भारतीं ।
होतें सैन्य अफाट फार धनही होती प्रजेची रती[17] ।।
श्रीमंतें रघुनाथराव पृतना[18] देऊनिया धाडिला ।
हिंदुस्थानिं वसूल खंड करण्या शिंदा सवें चालला ।। ३ ।।

---

१ अहल्याबाईला २ चांगल्या मनानें ३ अहल्याबाई ४ आई-बापांनीं ५ नवरा, पुत्र वगैरेंनीं ६ कसावर ७ दुःख देणारी ८ चांगला उपदेश ९ चांगल्या वाइटाचा विचार करणारा १० चतुर ११ शत्रूची १२ बादशाहा १३ ताबेदार १४ रजपुतान्यांतील राजे १५ मांडलिक १६ पेशव्यानें १७ प्रेम १८ सैन्य.

(शार्दूल-विक्रीडित.)

रा[1]माज्ञा जशि मान्य त्या कपिवरा[2], तैशीच मल्हारजी ।
आज्ञा पाळितसे ह्मणून प्रभुला[3] कांहीं नसे काळजी ॥
राघोबासह जावयास लिहिलें मल्हारबाला स्वयें ।
तत्पत्रास[4] नमी ससैन्यसुत[5] तो त्याला[6] मिळायास ये ॥ ४ ॥
खंडाचा महसूल फक्त करण्या-साठींच मोहीम ही ।
नाहीं घोर लढाइ हींत ह्मणुनी कन्या[7], स्नुषा स्त्रीसही[8] ॥
संगें घेउनि तो तयां रघुवरा जाऊनि भेटे यदा ।
ती जंगी पृतना[9] निघे झडकरीं खंडास घ्याया तदा ॥ ५ ॥
गेला उत्तरदेशिं तो रघुपती तेथें नृपांनीं तया ।
खंडा देउनि पाहुणेर करुनी ' तुह्मी करावी दया ' ॥
ऐसें प्रार्थुनि सैन्यही मदतिला देऊनि सन्मानिला ।
आनंदून निघे पुढें मग तसा कुंभेरिला पातला ॥ ६ ॥

(आर्या.)

यश देवीचें[11] ज्यांच्या[12], कर्णा-मध्यें शिरून सुख झालें ।
त्यां[13] भेटण्यास येतां, स्वागत करुनी तयांस[14] तोषविलें ॥ ७ ॥
प्रत्येक हिला[15] ह्मणती, ' साध्वि अहल्ये तुझी बहू कीर्ती ।
ऐकुन सीतादि सती, ह्मणतिल सहवास[16]-योग्य हीच सती'॥८॥

(शार्दूल-विक्रीडित.)

जाटांचा नृपती सुराजमल जो, त्याला भटांचा पती[17] ।
हट्टा पेटुनि ' कोटिखंड मजला द्यावा ' ह्मणे सन्मती[18] ॥
' देतों चाळिस लाख मी रघुपती ही दक्षिणा आपणा ' ।
नाहीं मान्य ह्मणून ' जिंकिन तया ' केलें रघूनें पणा ॥ ९ ॥
मोर्चा लावुनि कुंभिरीवरि तदा गोळा सुरू जाहला ।
जाटानेंहि चमूपती झडकरीं संरक्षणा धाडिला ॥
योद्धे थोर कितीक तेंवि रण तें जाती करोनी [19]घरीं ।
भूतांच्या पतिच्याच. दीडमहिना झाला, न प्राप्ती बरी ॥१०॥

---

१ रामचंद्राचा हुकुम २ मारुतीला ३ पेशव्याला ४ पेशव्याच्या पत्रास ५ सैन्य व पुत्र यांसह ६ राघोबाला ७ हरकूबाई व उदाबाई ८ अहल्याबाई ९ गौतमाबाईला १० सैन्य ११ अहल्येचें १२ ज्या राजस्त्रियांच्या १३ राजस्त्रिया १४ राजस्त्रियांना १५ अहल्याबाईला. १६ संगतीस योग्य. १७ रघुनाथराव १८ सुधी ( सुराजमल ) १९ कैलासीं.

केलें भोजन आणि येउन असा राहे उभा सत्वरीं ।
खंडोबा मग वैजयन्ति[1]-जवळीं हर्षेंच युद्धा करीं ॥
सूंसूं एक करीत गोलेक[2] तदा आला यमा-सारखा ।
खंडोबा-वरतीं पडून मग तैं केला पिता पारखा ॥११॥

(स्रग्धरा.)

गोळा वज्राप्रमाणें नृपति-वर-सुता[3] लागतां, शुद्धि[4]हीन ।
खालीं अंगास टाकी हरहर म्हणुनी तत्क्षणीं सांयुगीनें[5] ॥
ऐशा त्या मूर्च्छिताला झडकरिं शिबिरीं[6] नेउनीं सेवकांनीं ।
ठेवूनी देउनी त्या शिव शिव अगदीं शोक केला तयांनीं ॥१२॥

( शार्दूल-विक्रीडित. )

आला धांवत बाँप[7] मारित मुला हाका कशाला बरें ।
एकाकी लढण्यास जाउन असा होऊनि आलास रे ॥
कां नाहींस मुला अरे वदत तूं कांहीं तरी बोल बा ।
ऐसा दाटत कंठ कंठिं मिठि तो घालीच मल्हारबा ॥१३॥

( स्रग्धरा. )

मांता[8] ऐकून वार्ता, कहर उसळला काय देवा कसारे ।
केला त्वां घात माझा कुमरमृति[9]-मुळें हे प्रभो दीन सारे ॥
झालों आम्ही, कसारे तुजप्रति दिसला टाकुनी माय जाया ।
खंडू रस्ता यमाच्या पुरिं वदुन तिनें घातलें त्याच ठायां ॥१४॥
दादा आह्मांस आतां तुजविण दुसरा कोण आणील [10]गेहीं ।
मोठ्या प्रेमें बिजेलो[11] करुन धर मुली पैठणी घे तुला ही ॥
नाहीं कोणी वदाया हरकु दुजि उदा-बाइ बोलोनि त्यांनीं ।
भारी कल्लोळ केला सकल वसुमती अश्रुयुक्तों[12] करोनी ॥१५॥
[13]कल्हा ऐकूनि आले रघुपति[14]-मुख तैं शूर ते थोर थोर ।
पाहूनी या प्रकारा रडत रडत ते स्तब्ध ठेले[15] समोर ॥
कोणी कांहीं न बोले हळहळत मनीं काय हा कोप देवा ।
आह्मांसर्वांवरी तूं करुन अवकृपा काय नेशीच रावों[16]? ॥१६॥

---

१ निशाणा-जरी पटक्या-जवळ २ तोफेचा ( गोळा ) ३ मल्हाररावाच्या मुलाला ( खंडोबाला ) ४ बेशुद्ध ५ योद्धा ( सांयुगीनो रणे साधुः ) ६ तंबूत ७ मल्हारराव ८ गौतमाबाई ९ मुलाच्या मरणामुळें १० घरीं ११ भाऊबिजला १२ आंसवांनीं भरलेली १३ गोंगाट १४ रघुनाथराव प्रमुख १५ उभे राहिले १६ खंडेरावाला.

हंबर्डा फार मोठा मृत[1]-पति बघतां, फोडिला त्या सतीनें[2] ।
घाली तोंडांत माती वदन[3] बडवुनी ‘ काय केलें यमानें ’ ॥
ऐसें बोले रडे ती फिरुनि फिरुनिया आपटी मस्तकाला ।
भारी शोकास तेव्हां करुन मग करी बेत ही जावयाला[4] ॥ १७ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

माझा पुत्र न हा मनोरथ मला सोडूनि गेला स्वयें ।
मोतें लोटुनि शोक-सागरिं[6] मुला जाऊं नको तूंच, ये ॥
मी मेल्यावर श्राद्ध तें करुनिया आल्म्यास रे तर्पण ।
देणारा मज तूंच तूंच असतां, जासी कसा आपण ? ॥ १८ ॥
ऐसा शोक पिता बहूत करुनी निश्चेष्ट भूमीवरी ।
होवोनी पडला तशीच स्थितिही ती माय तेव्हां वरी ॥
कांता शोक पुरा करून वदली ‘ येतें प्रिया मी त्वरें ।
थांबाहो पुसतें नमून तुमच्या मातापित्यांना बरें ’ ॥ १९ ॥

( स्रग्धरा. )

पाणी नेत्रांस लावी रघुपति मग तो होउनी सावधान ।
पाहे तों सर्व दुःखी, वर-सुत[10] पडला, सून पायां पडून ॥
आज्ञा मागे स्वतांला पति-सह[11]-गमना, आणि जाटासि[12] शापी ।
हे दुष्टा रौरवीं[13] रे वसविल तुजला देव, तूं[14] फार पापी ॥ २० ॥
मल्हारी लाल झाला विसरुनि सगळा शोक बोले अमर्षे[15] ।
‘ जाटाला ठार जेव्हां करिन नगरि[16] ही ओस तैं पुत्र तोषे ॥
किल्ला फेंकून सारा यमभगिनि[17]-मधें देइना मी जरी हा ।
जन्मा येऊनि झालें विफल जनु मला निंदु भू-लोकं[18] हो हा ॥ २१ ॥
आहे ही ईश्वरेच्छा तिजप्रति मनुजें[19] दोष देणें अयोग्य ।
ऐसा साध्वी सतीनें निजमनिं करुनी त्या विवेकास[20] योग्य ॥
‘ मामाजी सुज्ञ आहां मज सहगमना पूर्ण आज्ञा असावी ’ ।
बोलोनी ती सती तत्पद[21]कमलिं शिरा स्फुंद स्फुंदोनि ठेवी ॥ २२ ॥

---

१ मेलेला नवरा २ साध्वी-अहल्ये-नें ३ तोंड ४ सती जाण्यास ५ मला ६ शोक-समुद्रांत ७ चलनवलन रहित ८ बायको ( अहल्याबाई ) ९ ( सासू सासऱ्याला ) आई बापांना १० श्रेष्ठपुत्र ११ सती जाण्यास १२ सुराजमल्लास १३ नरकांत १४ हे जाटा १५ रागानें १६ कुंभेरी १७ यमुनेंत १८ पृथ्वी १९ मनुष्यानें २० विचारास २१ त्या ( मल्हाराबा ) च्या पायांवर.

मालीरावास कन्ये[1]-सहि धरुन उरीं न्हाणुनी अश्रुयोगें ।
सासूच्या सासऱ्याच्या-जवळ मग तयां देउनी शिष्टि[2] मागे ॥
'कांताचा[3] योग नाहीं इह जरि घडला तो घडो स्वर्ग-लोकीं' ।
ऐसी आशी[4] तुम्ही हो सकृप[5] मजवरी होउनी आज द्या कीं ॥२३॥
शोकार्ता[6] शद्ब जेव्हां श्रवण करि पती माळ्याचा सुनेचे ।
दाटोनी कंठ भारी रडत मग मिठी कंठिं घाली तियेचे ॥
बाई[8] तूं काय जाशी मजप्रति उघडें खंडुनें आज केलें ।
तूं ही गेल्यावरी गे स्थविरपण[7] कसें कंठुं मी बोळ बाळें ॥२४॥
मी झालों वृद्ध हीही[9] तुज दिसत नसे ? वांकलेली जेरनें[10] ।
आम्हां दोघांस शोकीं बुडवुन मुलगा जाय स्वर्गीं त्वरेनें ।
त्याच्या पश्चात इच्छा जर सहगमनीं होत आहे तुला ही ।
आम्हां वृद्धां अनाथां मग तनय[11] सुता[12] कोण राखील पाही ॥ २५ ॥
यासाठीं बाइ हो मी विनय[13]-नत तुम्हां प्रार्थितों भीक घाला ।
सोडोनीया मला हो गमन करुं नये दीन ह्याही मुलाला ॥
तेव्हां खिन्ना स्नुषा ती बहु विनयवती हात जोडून याची ।
'त्यांच्या-मागें तुम्हांला मज बघुनि व्यथा मात्र होईल साची'।२६।

( शार्दूल-विक्रीडित. )

तेव्हां वृद्ध म्हणे मुली करुं नको या साहसाला बये ।
जाशी हट्ट धरून तूं तरि तसें आम्हींहि येऊं स्वयें ॥
चिंताऽऽक्रान्त[14] सती मनीं वदतसे आतां करावें कसें ? ।
जातां सत्पति[15]-मार्ग लक्षुनि तरी वृद्धान्त[16] हा होतसे ॥ २७ ॥

( मंदाक्रान्ता. )

मामाजीचे श्रवण करुनी बेत हे ती मनाशीं ।
बोले ' जावें तनय तनया आणि वृद्धादिकांशीं[17] ॥
सांभाळावें पति-मुनियमां[18] पाळुनी भक्तिभावें ।
श्री-कृष्णाची प्रतिदिनिं पुजा कीं करोनी रहावें ' ॥ २८ ॥

---

१ मुक्ताबाईस २ आज्ञा ३ नवऱ्याचा ४ आशिर्वाद ५ दयाळु ६ दुःखानें व्याप्त ७ म्हातारपण ८ मुली ( संबोधन ) ९ बायको (गौतमाबाई) ही १० म्हातारपणानें ११ मालीराव १२ मुक्ताबाई १३ विनयानें नम्र १४ चिंतेनें व्याप्त १५ श्रेष्ठ नवऱ्याचा रस्ता १६ म्हाताऱ्यांचा शेवट १७ म्हातारे वगैरेंना १८ पतिव्रता स्त्रियांच्या नियमास

मल्हारी तैं वदत मुलिला ‘ खंडु मानून तूंतें ।
राहूं आह्मी सहगमन हो सोड हट्टा-सवें तें ’ ॥
तेव्हां साध्वी सजलनयना बेत राहावयाला ।
मोठ्या कष्टें करुन वदली मान्य मी राहण्याला ॥ २९ ॥
तेव्हां सारा मृतविधि पुरा जाहला दुःखितानें ।
पुत्रानें हो स्मरण ह्मणुनी एक छत्री पित्यानें ॥
तेथें भॆंग्या उठवुन दिली, कांहीं खर्चास ग्राम ।
देऊनी हो चिरस्मरण तें चालवी तो इनाम ॥ ३० ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

व्हावा घात परंतु जाट कपटें दोघांमधें भांडण ।
लावी, याच मुळें तसाच पडला सिद्धी न गेला पण ॥
मल्हारी मग स्त्री, स्नुषा झडकरीं घेऊनि ये इंदुरीं ।
तेथें शोक विवेक पूर्ण करुनी तो घालवी हो दुरी ॥ ३१ ॥

( अहल्या-पति-निधन नामक ५ वा अंक समाप्त. )

## अंक ६ वा.

### श्वशुर-निधन.

( उपेंद्रवज्रा. )

माता-पित्यांनीं करुनी विचारा । दुःखास नाहीं दिधलाच थारा ॥
साध्वीस ऐसें करितां न आलें । तिनें दिनांलां झुरण्यांत नेलें ॥ १ ॥

( स्रग्धरा. )

पाहोनी तो पतिचा हयवर दुसऱ्या वस्तु पाहोनि त्याच्या ।
भारी शोका करूनी दर दिवस तिचा जाइ दुःखांत साच्या ॥
‘ जेथें सौभाग्य-योगें मम पति असतां नांदलें मी सुखानें ।
तेथें वैधव्य-दुःखीं दिवस किति कसे कंठुं, बाई श्रमानें ’ ॥ २ ॥
ऐसें बोले मनाशीं प्रतिदिवशीं झुरे अन्न कांहीं न खावें ।
एका बाजूस कोठें तरि बसून तिनें सर्वदाही रडावें ॥
पुर्वींच्या मैत्रिणींना बघुन भडभडे ऊर मानेस खालीं ।
घालोनी स्फुंद स्फुंदे रमण-हिन पहा दीन बाई जहाली ॥ ३ ॥

---

१ अश्रूंनीं डबडबले आहेत डोळे जिचे अशी २ उत्तर[illegible]या ३ दुःखित अशा ४ बापानें ५ सुंदर व मोठी ६ गांव ७ चिरकालचें स्मारक ८ शिंदे होळकरांत ९ आधार १० दिवसांना ११ नवऱ्याचा १२ श्रेष्ठ घोडा १३ माझा १४ नवऱ्यानें रहित

जातांना कुंकुमाला झडकरिं अलिका[1] लावुनी मीं वदावें ।
‘ बाई या हो बरें कां ’ सखिजन[2]हि वदे, ‘ येउं ’ त्यांनींहि जावें ॥
तो त्यांचा संघ[3] आतां असित[4] मम मुखा पाहुनी खिन्न झाला ।
ऐसा तुह्मी कसा हा मजवर प्रभुजी आणिला दुःख-वाला ॥४॥

( शार्दूल-विक्रीडित. )

ऐसा काळ तिचा कसातरि अहो जाया हळू लागला ।
ये आज्ञा प्रभुची ह्मणून लढण्या मल्हारबा चालला ॥
राज्याचा भर त्या सुनेवरि स्वयें तो शूर दे टाकुन ।
तो गंगाधर मंत्रि[5] नेमुन करी तैं घट्ट जाया मन ॥ ५ ॥

जातां पानिपतीं सदाशिवसवें मल्हारबा चौगुले ।
शिंदा, विंचुरवासि सर्व दुसरे योद्धे मिळाले भले ॥
भाऊ घेउन त्यांस तो हळुहळू दिल्लीप्रती पातला ।
त्यानें बादशहा तदा लुटुनिया तक्तीं दुजा स्थापिला ॥ ६ ॥

‘ हें आहे अगदीं अयोग्य तुजला ’ मल्हारबानें स्वयें ।
त्याला सांगितलें तरी न फिरुनी वाटेवरी भाउ ये ॥
कुत्सा तो करुनी तयास वदला ‘ रे मेषपाला[6] तुला ।
मुत्सद्दीपण काय हें न कळलें कां दोष देसी मला ’ ॥ ७ ॥

स्वामी-भक्त पुरा तयास दुसरा अद्यापि कोणी कधीं ।
बोलोनी दुखवी न, राव[7] दुखवी वृद्धास तेव्हां कुधी[9] ॥
जो त्याला चुलत्या-समान असुनी ज्यानें करूनी रणें[10] ।
बापाला[11], चुलत्यांस[12] साह्य दिधलें, त्याला अशा भाषणें ॥८॥

तेव्हांपासुनि निश्चयास करुनी मल्हारबा स्वीकरी ।
मौनातें, परि युद्ध तो निजबलें[13] उत्साह[14]-युक्तें करी ॥
नाहीं त्या सकलांस लाभ धवला[15] सत्कीर्तिचा[16] जाहला ।
त्यांमध्यें[17] पळुनी कितीक जगले, तैसाच हा[18] वांचला ॥ ९ ॥

---

१ कपाळाला २ मैत्रिणी ३ समुदाय ४ कृष्ण ( काळें ) ५ कारभारी ६ मेंढ्या राखणाराला ७ सदाशिवराव ८ वृद्ध मल्हारराव ९ दुष्टबुद्धीचा १० युद्धें ११ चिमणाजी आप्पाला १२ बाजीरावास १३ आपल्या सैन्यानें १४ उत्साही १५ शुभ्र १६ चांगला लौकिक १७ पानिपतच्या लढाईंत १८ मल्हारराव

( शार्दूल-विक्रीडित. )

इंदूराहुन मोहिमेवर[1] निघे मल्हारबा चौगुला ।
तेव्हां राज्य बघावयास सतिले[2] नेमी, तिनें चांगला ॥
राज्याचा मग कारभार करुनी संतुष्ट केली प्रजा ।
ऐसें ऐकुनि तोषला नरपती[3] मानी तिला आत्मजा[4] ॥ १० ॥

( स्रग्धरा. )

विप्रांनां[5] दान देणें, अमरपति[6]-पुजा भक्तिभावें करूनी ।
ऐसें आहे सुनेचें श्वशुर-वर बघे वागणें तो ह्मणूनी ॥
जाई युद्धार्थ राजा मुन प्रमद[7]-युता व्हावया-लागि मोठ्या ।
देवोनी नेमणूका प्रतिदिवशिं तिला दान-धर्मा कराया ॥ ११ ॥

( इंद्रवज्रा. )

होता जरी दान करावयाला ।
ओढा तरी ती कधिं ही बलीला[8] ॥
हो हात लावीत नसे वसूल ।
त्याच्याकडे[9] धाडिच साल-साल[10] ॥ १२ ॥

( स्रग्धरा. )

राज्याच्या कामकार्जी तिजकडुन असे जाहला खर्च त्याचा ।
ठेवी बाई लिहूनी प्रति दिवशिं नृपा[11] सर्व दावावयाला ॥
सारी सानंद[12] झाली रयत इजप्रती प्रेमळा माय मानी ।
ही कीर्ती ऐकुनी तो प्रमुदित[13] नृपती होय तैं स्वाभिमानी[14] ॥ १३ ॥
संग्रामांतून[15] आले जन पळुन तयां पाहुनीया व्रणींनां[16] ।
साध्वी होऊनि दुःखी घळ घळ रडली, देउनी अन्नदाना ॥
वस्त्रानें हीन त्यांना वसन जखमिंनां लाविलें औषधाला ।
एशी त्यांची व्यवस्था करुन मग घरीं संघ हा पोंचवीला ॥ १४ ॥

( आर्या. )

मल्हारबा पुण्याला, परभारें जाइ त्या प्रभूंचें[17] हो ।
सांत्वन करावया प्रभु, दिसतां दुःखाश्रु लागले वाहो ॥ १५ ॥
विश्वासराव भाऊ, मजला सोडून एकटे गेले ।
मल्हारबा कसें हो, या-परि नाना वदून तैं रडले ॥ १६ ॥

---

१ स्वारीला २ साध्वी अहल्याबाईला ३ ( मल्हारराव ) राजा ४ मुलगी ५ ब्राह्मणांना ६ परमेश्वर ७ आनंदित ८ साऱ्या ( चावडी ) ला ९ मल्हाररावाकडे १० दरसाल ११ मल्हाररावाला १२ आनंदित १३ आनंदित १४ स्वतांचा आहे अभिमान ज्याला असा १५ लढाईतून १६ जखम्यांना १७ पेशव्याचें.

हां[1]हि तदा शोक करी, भारी मग सांत्वनांस नानाच्या ।
कष्टं करी कसें तरि, कांहीं दिन राहिला घरीं त्यांच्या ॥१७॥

तेथें भूत[2]दयेची, स्तुति ऐकुनि आपल्या [3]सुनेची ते ।
झाले सानंद बहू, पुत्रापरि तीस मानिलें होतें ॥ १८ ॥

जेव्हां श्रीमंत[4] स्वतां, करुन तिचा फार फार स्तव[5] वदले ।
'संकटिं साह्या करुनी, सर्वांना स्व[6]गृहांस पोंचविलें ॥ १९ ॥

झाले अनंत सं[7]तिचे, उपकार जनावरी अशा समयीं ।
आहों आभारी बहु, राहो शत[8]वत्सरें इथें बाई' ॥ २० ॥

यापरि स्तुती सुनेची ऐकुन कोणा न हर्ष दाटेल ।
साध्वी बाई ही ही, सीतासतिच्या परी न वाटेल ॥ २१ ॥

या परिभवा[9]ऽऽधिमुळें, नानासाहेब जाइ वैकुंठा ।
दुःखें इंदुरिं येउनि, मल्हरीही विसाववी [10]कंमठा ॥ २२ ॥

मालीरावास पुरीं, द्वादश नप्त्रीसही असे नववें ।
तेव्हां वर्ष म्हणुनिया, केलीं लग्नेंहि तें तया रावें[11] ॥ २३ ॥

नप्त्रीस पानशांच्या, एथें दिधलें महेश्वरीं रावें ।
सुंदर वधू[12] बघूनी, मालीरावास वृद्ध[13] सुख पावे ॥ २४ ॥

जरि कन्यापुत्रांचीं, लग्नें केलीं तरीहि संसारीं ।
रति[14] साध्वीची नाहीं, झाली खिन्नान्तं[15] ती असे भारी ॥ २५ ॥

सेवी न मद्य[16]मांसा, अंगावरीं एकही अलंकार ।
घाली कधींहि न सती, रंगी वस्त्रास ती करी दूर ॥ २६ ॥

---

१ मल्हारराव २ प्राणिमात्रावरील दयेची ३ अहल्या बाईची ४ पेशवे ५ स्तुति ६ आपल्या घरांस ७ साध्वी अहल्याबाईचे ८ शंभर वर्षे ९ पराभवाच्या योगानें झालेल्या मानसिक दुःखामुळें १० धनुष्य ११ मल्हाररावानें १२ नवरी १३ मल्हारराव १४ प्रेम १५ उदास अंतःकरणाची १६ दारुला व मांसाला.

कोठेंतरि क्षेत्राला, राहुन सार्थक करीन देहाचें ।
श्वशुरास[1] यापरी ती, याची तेंव्हां ह्मणेहि तो साचें[2] ॥ २७ ॥

मग तो महेश्वरीं त्या, साध्वीला[3] राहण्यास आज्ञा दे ।
श्वशुराज्ञा[4] मानुनि ती, तेथें मग राहिली बहू मोदें ॥ २८ ॥

राज्याचा भार परी, नाहिं तिच्या काढला अहो वरचा ।
तेथून राज्य पाही, श्वशुराज्ञा मोक्ष मानि ती साचा ॥ २९ ॥

माहिष्मती असे ज्या, नगरीचें नाम हो पुराणांत ।
बोलति महेश्वर तिला, रेवा[5]-तीरीं असे बहू कांत ॥ ३० ॥

अरुणोदयीं[6] उठावें, नामस्मरणास भक्तिनें करुन ।
प्रातर्विधि उरकुनि ती, स्नान करी नर्मदेस जाऊन ॥ ३१ ॥

देवपुजा करुन तिनें, गोदानांनीं[7] द्विजांस[8] सुखवावें ।
भोजन करि, ग्रंथ बघे, पुराण ऐके पुढें बहू भावें ॥ ३२ ॥

सायंकाळीं दर्शन, देवाचें घेउनी फराळाला ।
सारावें मग सतिनें, ईश्वरभजनांत लोटि वेळाला ॥ ३३ ॥

नंतर थोडें निजणें, ऐशा नित्यक्रमास[9] ती योजी ।
असमाधान[10] जरि कधीं, तरि मोडी ना हि या क्रमाला जी॥३४॥

( स्रग्धरा )

झाली आज्ञा धन्यांची[11], ह्मणुन नरपती[12] धावयालागिं आजी ।
मालीरावास संगें तनुज[13]परि जया मानिलें तो तुकोजी ॥
घेवोनीया निघाला त्वरित रघुपती[14]-लागिं भेटेच जीर्णें[15] ।
राज्याचा भार बाई प्रतिनिधि-सह[16] ती वाहि त्यां[17] काळजी न।३५॥

---

१ सासऱ्यास ( मल्हारवाला ) २ खरें ३ अहल्याबाईला ४ सासऱ्याचा हुकुम ५ नर्मदेच्या कांठीं ६ ब्राह्म मुहुर्तावर ७ गोप्रदानांनीं ८ ब्राह्मणांस ९ नेहमींच्या-क्रमास १० आजार वगैरे ११ पेशव्यांची १२ मल्हारराव १३ मुलगा १४ रघुनाथ-रावाला १५ ह्मातारा ( मल्हारराव ) १६ कारभाऱ्यासह १७ मल्हाररावाला

### आर्या.

तेव्हां रणें तुमुलही, झाल्यावर ते[१] अलंपुरा आले ।
ठणके कान तयाचा, ह्मणुनी हैराण फार ते[१] झाले ॥ ३६ ॥
औषध केलें बहु परि, गुण नाहीं वाटलें मुळीं न सुख ।
मल्हारबा स्वदेवा[२], चिंतुनि सोसिति कसें-तरी दुःख ॥ ३७ ॥
निर्वाण[३]-वेळ जाणुनि, पौत्राला[४] त्या समीप बोलविलें ।
हातीं तुकोजिच्या त्या, देउन 'सांभाळ रे मुला' बोले ॥३८॥
आहल्याऽऽज्ञा पाळी, तिजला देऊन मदत आनंदें ।
घेउन नाम-स्मरणा[५], वृद्ध[६] मिटी नेत्र तो बहू मोदें ॥ ३९ ॥

### ( स्रग्धरा. )

जो होता चौगुला हो परिश्रम करूनी पावला राज्य मोठें ।
प्रभ्वाज्ञा[७] मान्य केली सतनय[८] मरणा पावला, त्यास कोठें ॥
स्वामीनिष्ठास जागा स्वनगरिंत नसे वाटुनी त्या यमानें ।
केलें आतिथ्य[९] त्याचें मग शिवगिरिला[१०] धाडिलें त्यास मानें ॥४०॥
कैलासीं पाहिलें तों स्वतनुज[११] दिसला, नाहिं पत्नी[१२] ह्मणून ।
थोडासा खिन्न झाला परि बहु दिन ही राहिली खिन्नता न ॥
पत्नी ती गौतमाही, पति-निधन[१३] तिनें ऐकुनी दुःख केलें ।
आली हर्षे पहाया मृडगिरिंत[१४] पती पाहुनी सौख्य झालें ॥ ४१ ॥

### ( शार्दूलविक्रीडित. )

दुःखाचा गिरि कोसळे सतिवरी[१५] किंवा तदा वज्र तें ।
येऊनी पडलें सतीस गमलें कष्टें गिळी दुःख तें ॥
मालीराव पुढें करून नृपती राज्यास ती चालवी ।
भारी सुंदर ती कथा श्रुतिपथीं[१६] जावो सतीची नवी ॥४२ ॥

( अहल्या-श्वशुर-निधन नामक ६ वा अंक समाप्त. )

---

१ मल्हारराव २ जेजूरीच्या खंडोबाला ३ मरणाची वेळ ४ नातवाला ५ देवाच्या नांवाचें स्मरण ६ मल्हारबा ७ पेशव्याचा हुकूम ८ मुलासह ९ आदरसत्कार १० कैलासाला ११ आपला मुलगा ( खंडेराव ) १२ बायको १३ नवऱ्याचें मरण १४ कैलासीं १५ अहल्याबाईवर १६ कानांत.

# अंक ७ वा.

## सुत-निधन.

( शिखरिणी. )

दुरोनी पाहोनी हिमनग[1] मना तोषें[2] गमतो ।
दिसे भारी रम्याऽऽकृति[3] परि तसा खास नसतो ॥
कडे मोठे मोठे दिसति बहु गंभीरेंचि[4] गुहा[5] ।
चढोनी जातांना सुख नसुन देई श्रम महा ॥ १ ॥
तसें या साध्वीचें चरित बघतां वाटत असे ।
जरा सौख्या झालें प्रथमवयिं[6] आतां सुख नसे ॥
पती गेला सासू गत तशिच झाली, श्वशुरही ।
असे गेला तीतें त्यजुनि उघडी हो पडलि ही ॥ २ ॥

( उपजाति. )

आतां हिला राज्य पहावयाचा ।
प्रसंग आलाच, उपाय साचा ॥
कांहीं नसे यास्तव या सतीनें ।
केलें तदा राज्य स्वयें धृतीनें[7] ॥ ३ ॥

( शालिनी. )

आलंपूरीं मालिरावास वस्त्रें ।
गादीचीं तैं देउनि शस्त्र अस्त्रें ॥
राघोबा तो जाइ जेव्हां पुण्याला ।
इंदूरीं तो मालिराजा हि आला ॥ ४ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

मालीराव प्रभू[8] पित्यापरि[9] दिसे जो शूरही चांगला ।
तो राज्यीं बसतांच बालिश[10] तसा वागावया लागला ॥
राज्याचें नुकसान हा भरुनियां काढील ऐसें जना ।
मातेलाहि[11] तसेंच वाटत असे. गेल्या वृथा कल्पना ॥ ५ ॥

---

१ हिमालय २ आनंद ३ मनोहर आकाराचा ४ खोल ५ दऱ्या ६ बालपणीं ७ धैर्यानें ८ राजा ९ खंडोबाप्रमाणें १० मूर्ख ११ आईला ( अहल्याबाईला. )

( स्रग्धरा. )

मातेनें त्या करावी अतिथिवर[1]पुजा फार हो भक्तिभावें ।
विप्रांनां गोप्रदानें धनवसन तसें देउनि तोषवावें ॥
मालीराजा द्विजांना प्रतिदिवशिं अहो दान[2]पात्रीं विखारी[3] ।
विंचू घालून त्यांना मग वदत असे ‘ घ्या तुह्मी द्रव्य भारी ’ ॥६॥
“ माझ्या हातून झालें खडतर अगदीं पाप मागील जन्मीं ।
यासाठीं दुष्ट पोरा प्रसवुन जननी या पदा पावलें मी ॥
बाई ! वंध्यात्व होतें सुसह मज ” वदे ‘ काय आतां करावें ’ ।
विप्रांच्या लागुनीयां मग पदकमलीं ती[4] क्षमा याचि भावें ॥७॥

( उपजाति. )

एके दिनीं प्राशन[5] मद्य फार ।
करून स्वांरी[6] करि दुष्ट चारें[7] ॥
दिवाण[8] कार्यार्थचि[9] तत्रं[10] आला ।
त्यानें[11] दिला फाराचि ठोक त्याला ॥ ८ ॥

( शिखरिणी. )

तुकोजी रावानें स्मरुन चुलत्याच्या उपकृती[12] ॥
तसी आज्ञा त्यानें मृति-समयिं[13] केली सकल ती ॥
धरूनीयां चित्तीं जननिपरि मानीच सुसती ।
नृपा[14] बंधू ; * होसी सुजन सुखवाया बहु रती ॥ ९ ॥

( स्रग्धरा. )

एकांतीं मालिरावा धृति धरुन वदे एकदा तो तुकोजी ।
‘ दुष्कृत्यानें तुझ्या या पडतिल नरकीं बाप आजाहि आजी ॥
माता दुःखाश्रु ढाळी बघ दिन तिजला जाई दुःखांत सारा ॥
यासाठीं सोड कृत्यें ’ नृपें[15] वदत असे दुष्ट तो यास मारा॥१०॥

( शार्दूलविक्रीडित. )

गुद्दे देउन त्यास तो नृपें वदे ‘ जावें अरे तूं घरा ।
एथें तूं पद आपलें पुनरपि ठेऊं नये पामरा[16] ॥
चित्तीं ठेउन वाग नाहितर मी काढीन राज्यांतुन ’ ।
दुष्टें फार शिव्या तयांस[17] दिधल्या. जाई तुका तेथुन ॥ ११ ॥

---

१ श्रेष्ठ अतिथीची पुजा २ दान देण्याच्या भांडयांत ३ विषारी ४ अहल्याबाई ५ पिणें ६ मालीराव ७ चेष्टा ८ गंगाधर ९ कामाकरितां १० तेथें ११ मालीरावानें १२ उपकार १३ मरणाचे वेळीं १४ मालीरावाला १५ राजा १६ नीचा १७ तुकोजीला *मालीरावास बंधू मानी.

( शार्दूलविक्रीडित. )

येई जैं लहरी तदां[1] परिजना[2] बक्षीस देई बरें ।
शिक्षा त्या अपराधहीन[3] स्वजना[4] देई करी घाबरें ॥
राजा वेनच जन्मला पुनरपी ऐसें जना भासलें ।
मातेच्या वदनाकडे बघुनिया सोसीत त्रासा भले ॥ १२ ॥

( स्रग्धरा. )

जैसें नासून गेल्या तरुशिखरफला[5] भूमि आकर्षणानें[6] ।
खालीं पाडी तसा हा वरनृपतिपदा-पासुनी[7] त्या मृतीनें[8] ॥
पाडोनी त्यास नेला सकल-जन-मुखीं वृत्त झालें असें कीं ।
'ती देवी आत्मजाला विषय-जन-सुखा-लागिं[9] धाडीच नाकीं[10] ॥ १३ ॥
जी साध्वी पुण्यकर्में प्रतिदिवशिं करी धर्मकृत्यांत काल ।
सारा जी घालवी ती स्वसुतहनन[11] या पातकाला करील ? ॥
ऐसें होणेंच नाहीं प्रसृत[12] जनमुखीं वृत्त झालें असत्य ।
साची वार्ता असी कीं 'कितितरि दिन तो रुग्ण[13] होताच सत्य ॥ १४ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

कोणी एक प्रसिद्ध मांत्रिक तदा त्या इंदुरीं राहुनी ।
मालीराव-नृपास रोज फसवी दासीसही भोगुनी ॥
ही वार्ता कळली तई, नवनृपें आणूनि त्या मांत्रिका ।
सत्योऽसत्य[14] न पाहतां मग करी आज्ञेस 'मारा ठका' ॥ १५ ॥

( स्रग्धरा )

तेव्हां त्या मांत्रिकानें नृप-पदें[15] धरिलें बोलिला तो नृपाला ।
'नाहीं कृत्यांत या मी मज नृपति-वरा, मारणें पामराला ॥
नाहीं रे योग्य कांहीं जर मजप्रति तूं मारशी न्यायहीन ।
होऊनी भूत राजा उरिं बसुन तुझ्या खास घेईन प्राण' ॥ १६ ॥
मारूनी ठार त्याला मग नरपतिनें[16] चौकशी चालवीली ।
तों केलें कृत्य खोटें प्रतिति असि तदा त्या नृपाळास आली ॥
'होवोनी भूत आतां उरिं बसुन मला मारितो खास हा कीं' ।
ऐशी त्याच्या मनाला दहशत[17] बसली याच शब्दांस घोकी ॥ १७ ॥

---

१ तेव्हां २ चाकराला ३ निरपराधी ४ सुजनलोक ५ झाडाच्या शेंड्यावरील फळाला ६ गुरुत्वाकर्षणानें ७ श्रेष्ठ राजपदापासून ८ मरणानें ९ राज्यांतील लोकांच्या सुखासाठीं १० स्वर्गांत ११ आपल्या पुत्राची हत्या १२ पसार १३ आजारी १४ खरें खोटें १५ राजाचे पाय १६ मालिरावानें १७ धास्ती.

देवी साध्वीस तेव्हां सुत-निधन[1] दिसूं लागलें, त्यास तीनें ।
अंगारा आणि दोरा निजसुत[2] उठण्या फार केला मतीनें ॥
केलेले यत्न सारे सफल अगदिंही नाहिं झाले, मुलानें ।
साध्वीला आणि प्राणां मग पति-गमनें[3] सोडिलेंही सुनेनें ॥ १८ ॥
ज्यानें गादी श्रमानें मिळवुनि तनुजा[4]-साठिं केल्या लढाया ।
जो योद्धा फार मोठा प्रबल अरि जया लागती हो नमाया ॥
जो स्वामीनिष्ठ मोठा, रघुपति-मुख ते मानिती ज्यास फार ।
त्याच्या वंशांकुराला[5] खुडुन यम कसा दुष्ट झालाच गार ॥ १९ ॥
भर्ता सोडून गेला, श्वशुर मग निघे जावया स्वर्ग-लोका ।
सासू गेली तयांना अनुसरुन पुढें पुत्र गेलाच नाका ॥
साध्वी देवीवरी हा क्रम धरुन कसा कोपला देव साँच्या[6] ।
दुःखाचा अंत नाहीं अजुन प्रभुंवरें[7] कांहिं केला सतीच्या ॥ २० ॥

(पृथ्वी)

असो चतुर वा नसो रत[8] परोपकारीं न वा ।
असो विमल[9] मानसीं[10] व्यसनहीन पापिष्ठ वा ॥
दिलें जननिला जरी सुख तसेंच दुःखा जरी ।
तरी निजसुतास ती स्वसुख-कंद[11] मानी खरी ॥ २१ ॥

(शार्दूल-विक्रीडित)

होता अंत मुलास घालुन मिठी आक्रांत केला तिनें ।
कांताला, श्वशुरास आठवुन त्या सासूसही साध्विनें ॥
देवा अंत किती पुढे बघसि या साध्वी सतीचा अरे ।
सर्वज्ञा तुज हें कसें न कळलें अद्यापि सोनें खरें ॥ २२ ॥

( स्रग्धरा. )

सोन्याचा पारखीही कनक[12] बघुनिया त्यास भट्टींत टाकी ।
झालें तें लाल भारी मग उचलुनिया त्यास भारीच ठोकी ॥
टाकी भट्टींत त्याला पुनरपिहि पुन्हां ठोक ठोकोनि त्याला ।
लावी भारी कसाला तशिच कृति[13] दिसे ईश्वराची जनाला ॥ २३ ॥

**( अहल्या-पुत्र निधन नामक अंक ७ वा समाप्त )**

## पूर्वार्ध-समाप्त.

---

१ मुलाचेंमरण २ आपला मुलगा ३ सती जाऊन ४ मुला ५ वंशाच्या रोप्याला ६ खऱ्या ( साध्वी देवीवर ) ७ईश्वरानें ८ निमग्न ९ निर्मल १० मनांत ११ आपल्या सुखाचा गड्डा १२ सोनें १३ करणी

KASHINATH NARAYAN SANE, B.A.

# उत्तरार्ध प्रारंभ

## अंक ८ वा.

### राज्यसंकट

( भुजंगप्रयात )

'जगीं सर्व सूखी असा कोण आहे' ।
समर्थाऽग्रणी[1] वाक्य चित्तांत ध्या हें ॥
जयानें स्वयें राज्य केलें, तसी ती ।
यशःप्राप्ति[2] ज्याला अहो नित्य होती ॥ १ ॥
तयाचा पुढें वंश निर्वंश[3] झाला ।
निवापांस[4] त्यानें दुजाच्या मुखाला[5] ॥
पहावें अशी प्राप्त झाली स्थिती ज्या ।
कसें दैव कोपे सतीच्याच[6] राज्या ? ॥ २ ॥

( मालिनी )

धनगर असुनी जा राज्य मोठें मिळून ।
प्रतिनिधि-परि[7] पावें मान राजाकडून ॥
सकल अज अज्ञांना[8] राखणें दूर सारी ।
प्रबलतम[9] अरींना[10] लोळवी शूर स्वारी ॥ ३ ॥

( स्रग्धरा )

मल्हारी[11] थोर कीर्ती मिळवुन जगतीं वाजवी नामें-ढक्का[12] ।
त्यामागें बैसला तत्तनुजसुत[13] पदीं मालि जो मूर्ख पक्का ॥
ऐशाही मूर्ख पोरा बघुन कसितरी घालवी साध्वि काला ।
देवाला पाहवेना म्हणुन यम तिचा पुत्र नेई पुरीला[14] ॥ ४ ॥

शार्दूल-विक्रीडित

गेलें राज्य न हें लयां[15] मज गमे ही ईश्वराची दया ।
त्यानें बुद्धि दिली तदा सतिस हें द्याया तया पेशव्यां[16] ॥
तीतें राज्य मिळे प्रजेस सुख तें द्याया झटूं लागली ।
इत्यादी सुकथां[17] तुम्हां परिसुनी होवो मती चांगली ॥ ५ ॥

---

१ समर्थ श्रेष्ठ ( रामदास ) २ यशाचा लाभ ३ निसंतान ४ तीलांजलीला ५ तोंडाकडे ६ अहल्याबाईच्या ७ मुख्य प्रधानाप्रमाणें ८ शेळया मेंढ्यांनां ९ सर्वांत प्रबल १० शत्रुंनां ११ मल्हारराव १२ नांवाचा डंका १३ त्याच्या मुलाचा मुलगा ( मालिराव ) १४ शहराला १५ नाशास १६ माधवरावास १७ चांगलीकथा ( गोष्ट )

मालीराव मृतीमुळें[1] सकळिंका[2] चिंता नवी लागली ।
कोणा मालक नेमुं गादिवर या राज्या करो मावली[3] ॥
हिंदूधर्म असा असे मुलिप्रती राज्योऽऽप्ति[4] नाहीं कधी ।
तेव्हां त्या सतिला बरा न दिधला सल्ला प्रभोनें[5] कुधी[6] ॥ ६ ॥
तेव्हां मालवदेशिं तो रघुपती सैन्यास घेऊनिया !
होता हिंडत त्यास लांच मुलगा ओट्यामध्यें घ्यावया ।।
घ्यावा हें कथिलें तिला कुमतिनें धर्मार्थ[7] प्रांता जरा ।
घेवोनी मग स्वस्थ वा घरिं बसा क्षेत्रें तुह्मी तीं करा ॥ ७ ॥

( शिखरिणी )

दिवाणाचा होता मतलब असा कीं बसवुनी ।
मुलाला या राज्यीं सकल नृपसत्ता[8] हरवुनी ॥
स्वयें या राज्याची अधिकृति[9] बघावीच, सतिनें[10] ।
घरीं वा सुक्षेत्रीं बसुन करणें देव-भजनें ॥ ८ ॥

( उपेंद्रवज्रा )

ह्मणून बोले जरि कारभारा ।
कराल तुह्मी तरि तो दरारा ॥
जनावरी नाहिं बसावयाचा ।
मुलास घ्यावें नृप तोच साचा ॥ ९ ॥

( शार्दूल-विक्रीडित )

पाणीदार सती मुळीं न बदली त्याला वदे सत्वरीं ।
'राज्या वारस जे नृपाळ बसले इंदूरिं गादीवरी ।
एकाची जननी[11] असून वनिता[12] एका नृपाची अरे ।
आहें मी ह्मणुनी मलाच करणें हें राज्य बाबा बरें ॥ १० ॥
लांचा देउन मी कधीं न मुलगा ओट्यामध्यें घेइन ।
राज्या चालवुनी प्रजा मम[13] सुता-पेक्षां बहू मानिन ॥
जो जो धर्म मला असेल करणें तो तो स्वतांच्या करें ।
देणारी असतां कसें मग पर-स्वाधीन[14] होऊं बरें? ॥ ११ ॥

---

१ मरणामुळें २ सगळ्यांना ३ मातोश्री ( अहल्याबाई ) ४ राज्याचालाभ ५ गंगाधरानें ६ दुष्टबुद्धी ( जो प्रधान त्या )नें ७ दानधर्म करण्याकरितां ८ राजाचा अधिकार ९ अधिकार १० अहल्याबाईनें ११ आई १२ बायको १३ माझ्या १४ दुसऱ्याच्या ताब्यांत

ऐसें भाषण योग्य ती[1] करुन ही बोले तयाला पुन्हा ।
'द्यावें बालक तें कसें करिल हो हें राज्य मोठें पहा ॥
सामांजी[3] कर तो धरून वदले जें त्या तुकोजी-प्रती ।
ती आज्ञा शिरसाप्रमाणच तशी वागेन मी संप्रती' ॥ १२ ॥

( शिखरिणी. )

तुकोजी हा राजा ह्मणुन फिरवी डौंहि[4] सुमती ।
तया भावोजीला कथि मग 'पहा ही वसुमती'[5] ॥
असी त्या साध्वींची सरल कृति वाटे कटु अती ।
करी यत्ना भारी सचिव[6] फिरवाया तिजप्रती ॥ १३ ॥

( स्रग्धरा. )

लोभी गंगाधरानें बघुनच अबला घात आतां करावा ।
ऐसी इच्छा धरूनी मग लिहि खलिता तो रघूनाथरावा ॥
'हें मोठें राज्य आतां प्रभुवर तुमचें येउनी चालवावें ।
कोणाचा हक्क नाहीं त्वरित रघुपती येउनी राज्य घ्यावें' ॥ १४ ॥

नानासाहेब ज्याला प्रिय बहुत असे राम जैसा अनंता ।
ज्यानें मोठ्या लढाया करुन मिळविलें लौकिकाला अनंता ॥
तो राघोबा भरारी कलह करुनियां भ्रातृजा माधवाला ।
बोले 'राज्यार्ध द्यावें' प्रणिहित[12] नच हो, घालि ही एक घाला ॥ १५ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

होता माधव शूर दूरवर ती दृष्टीहि होती जया ।
त्यानें त्या चुलत्यास[13] तैं पळविलें युद्धास देऊनिया ॥
तेंव्हां मालवदेशिं राज्य मिळतें ऐसें तयां[13] वाटलें ।
दुष्टें त्या सचिवें तदा मदतही देऊन बोलाविलें ॥ १६ ॥

( स्रग्धरा. )

मी येतों, साह्य आतां मजप्रति तुमचें पाहिजे इंदुराला ।
ऐसी चिट्टी रघूची बघुन सुख मना वाटलें ब्राह्मणाला[14] ॥
ही वार्ता त्या नणंदेप्रति मग कळली साध्विला बोलली ती ।
झाला हा दुष्ट पाजी द्विजवरें[15] उलटा, यांस[16] काढा सुयुक्ती ॥ १७ ॥

१ अहल्याबाई २ कारभाऱ्याला ३ मल्हारराव ४ दंवडी ( डांगोरा ) ५ पृथ्वी ( राज्य ) ६ गंगाधर यशवंत ७ कृतीला ८ दाशरथी राम ९ लक्ष्मणाला १० अमर्याद ११ पुतण्याला १२ मिळालें नाहीं १३ राघोबास १४ कारभाऱ्याला १५ ब्राह्मणश्रेष्ठ, ( गंगाधर ) १६ ह्याविषयीं योग्य व्यवस्था करण्यास.

( शिखरिणी. )

उदाबाई बोले सतिप्रति तदा वाक्य सरतें[1] ।
तुह्मां दाणा-गोटा भरडुन भरावें उदरें[2] तें ॥
तशी आह्मां भिक्षा मिळवुनच लागेल भरणें ।
असा आला वाटे समर्थच[3] उपायास करणें ॥ १८ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

झाली लाल सती तिला मग वदे 'तूं स्वस्थ राहा बये ।
प्राणा देइन मी परी द्विजकरीं हें राज्य जाऊं नये ॥
ऐसा कांहिं तरी इलाज करितें, देवो मला धैर्य ती ।
देवी साह्य करो तसें' ह्मणुनियां केली शिवेला नती ॥ १९ ॥

( आर्या. )

बाजी-पुत्र शिवाला, आत्माजीच्या सुतास बोलविलें ।
राजाराम जयाचें, नाम तया सकल वृत्तें ऐकविलें ॥ २० ॥

ब्राह्मण हरामखोरी, करितो आहे तरी तया सांगा ।
"देईन मी लढाई, अपयश येतां तुह्मां नसे जागा ॥ २१ ॥

(युग्म) माझ्या श्वशुरानें हें, राज्य मिळविलें बहू श्रमानें जी ।
तें राज्य सहज तुह्मां, प्राप्त कधीं होइना करा आजी" ॥ २२ ॥

ऐसें बोलून सती, राजांनाही[6] लिहीच लेखांस ।
"आज जशी स्थिति माझी, तैशी तुमचीहि ती पुढें खास ॥ २३ ॥

(युग्म) माझें बेवारस हें, राज्य पहातो रघूपती ध्याया ।
न्यायाऽन्याय न पाही, यास्तव साह्या करावयाला या" ॥ २४ ॥

साध्वीचें पत्र बघुन, निश्चय केला तया नृपांनींही ।
"सत्पक्ष धरुनि आपण, साह्य करूं या सतीस पुष्कळ ही" । २५ ।

---

१ शेवटचें २ पोट ३ प्रसंग ( वेळ ) ४ देवीला ( पार्वतीला ) ५ हकीकत ६ स्नेही राजांना ७ खलित्यास ८ खरी बाजू.

( शार्दूल-विक्रीडित. )

तेव्हां दीर तिचा तुकोजि सगळ्या फौजेस घेऊनिया ।
मेवाडांत उदेपुरीं नृपतिच्या कार्यार्थ होता तया ॥
धाडी पत्र ' तुह्मी चमूसह स्वतां यावें इथें सत्वरीं ' ।
आज्ञा पत्र बघूनि तो परतला, आला तुकोजी घरीं ॥ २६ ॥
वंदूनी सतिला ह्मणे मग तिला ' आज्ञा कशाची मला ।
आहे ' तैं वदली सती सकलही ' तो पेशवा आपला ॥
आहे घात करीत त्यास दुसरा तो साह्य गंगाधर ।
यासाठीं धृतिला धरून मग हें सांभाळ तूं इंदुर ' ॥ २७ ॥
केला बेत परंतु पार फसला जाणूनि गंगाधरें ।
येथूनी पळुनी रघूस मिळण्या जावें अती सत्वरें ॥
ऐसा बेत करून तो निघुनही गेला, मिळाला, नवा ।
त्यांनीं बेत करून ते निघति ही त्या इंदुरा तधवा ॥ २८ ॥

( शिखरिणी. )

अहल्याबाई तैं लिहि सकल वृत्तांत सक्षेपा ।
पुण्याला धाडाया बहुत चतुरा माधव-नृपा ॥
' अशावेळीं कन्ये-परि अवन राजा मम करा ।
मला साह्या द्याहो अनय नय पाहा बहु बरा ' ॥ २९ ॥

( आर्या. )

सतिनें पत्र असें तें, माधवरावास धाडिलें तेव्हां ।
सरदार धाडिलाही, कळवाया सकल भेद त्याला हा ॥ ३० ॥
ती बाइ अहल्या मग, माधव-पत्नी रमासती इजला ।
उंची नजराण्यासह, धाडि दुजें पत्रही करी नेतिला ॥ ३१ ॥

( स्रग्धरा. )

ऐका तें पत्र आतां, " सकल-गुणवती श्रीमती पुण्यं[१०]वासी ।
सौभाग्या[११]ऽखण्डलक्ष्मीऽयुत सदय[१२] रमा-बाइला दीन[१३] दासी[१४] ॥

---

१ अहल्याबाईचा २ राजकारणाकारितां ३ सैन्यासह ४ रघुनाथराव ५ अगदीं ६ इंदुराहून ७ दयाळू अशा ८ रक्षण ९ नमस्काराला १० पुण्यांत राहणारी ११ सौभाग्य आणि अखंड लक्ष्मी यांनीं युक्त १२ दयाळू १३ गरीब १४ चाकर.

आर्थी चित्तास द्यावें श्रवण करुनिया योग्य तैसें करावें ।
श्रीमंताच्या कृपेनें विभव[1] मिळविलें सासऱ्यानें पहावें ॥ ३२ ॥

या साठीं सर्वसत्ता[2] मम[3] करिं असणें योग्य आहे नव्हे कां? ।
दादासाहेब आम्हां-प्रति सचिव अहो साह्य घेऊन बाको[5] ॥
बाकायालाच लावीं करणि बरि नव्हे हें पतीलागीं[6] सांगा ।
हें आम्हां अन्न चालो सतत परिजनीं[7] लोभ ठेवूनि वागा ॥ ३३ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

आला सन्निध तो रघूपति तदा धैर्या धरूनी सती ।
बोले ती सकला प्रजेस ' तुमची ठेवा तयारी अती ' ॥
सेनेच्या अधिपास ही मग कथी ' सैन्यास घेऊनिया ।
माझ्या हातिंवरी शरांसह धनू ठेवा लढाईस या ' ॥ ३४ ॥

दासी दास तसेंच लोक असती संतुष्ट ज्या साधिला ।
तीतें तें खुष सैन्यही जननिसें मानी तया बाइला ॥
याचें कारण त्यांस ती कधिं कधीं बक्षीस देई भलें ।
मोठें, आणि पराक्रमा स्तवुनिया मानी तयांना मुलें ॥ ३५ ॥

ऐसें सैन्य तयार होय मग ती धाडी निरोपासही ।
राघोबास तदा ' स्वतां असुन मी भीरूं नसे शूरही ॥
तुह्मी चाकर शूर वीर-वरही आहां परंतु त्वरें ।
सेना जिंकिल माझि तें सुख तुह्मी दावाल कोणा बरें ' ॥ ३६ ॥

( आर्या. )

गाइकवाडाच्यापरि नागपुराच्याहि त्या अधीशानें[11] ।
सेनों[12] मदतीस तिला, धाडुन दिधली बहूत प्रेमानें ॥ ३७ ॥
रेवा[13]-तटिं येउन ती, तळ[14] देउनि राहिली लढाईला ।
दुसऱ्याही राजांनीं, येतों मदतीस कळविलें तिजलों[15] ॥ ३८ ॥

---

१ वैभव २ अधिकार ३ माझ्या ४ हातांत ५ चतुर ६ नवऱ्याला ( माधवरावाला ) ७ चाकरावर ८ सेनापतीस ९ सैन्यास १० स्त्री ११ राजानें १२ वीस हजार सैन्य १३ नर्मदेच्या कांठीं १४ छावणी १५ अहल्याबाईला.

( स्रग्धरा. )

साध्वीचा पोंचला जैं रघुपति प्रति तो लेख वाचून फेंकी ।
युद्धाचा बेत केला झडकरिं निघुनी येइ क्षिप्रे तटाकीं[1] ॥
होते आतां लढाई म्हणून निजशिरों[2] सां[3]ध्वि पायींच आशी[4] ।
ध्यायां ठेवी तुकोजी तिथुन मग निघे युद्ध द्याया रघूशीं ॥३९॥

( शार्दूल-विक्रीडित. )

राघोबास तुकोजि पाठवि अशा तेव्हां निरोपाप्रती ।
' क्षिप्रेच्या इकडे[5] तुह्मी जर पदा ठेवाल हो तैं अती ॥
देऊं ठोक तुह्मांस योग्य करणें वाटेल तें आपण ।
आहां थोर परंतु गांठीं मजशीं सिद्धीस नेतों पण ' ॥ ४० ॥

( आर्या. )

विश्वास घातकी त्या, सचिवाला आणि दोष दादाला ।
अन्याया-बद्दल हो, देउन शिंदा वदे रघूपतिला ॥ ४१ ॥

" अहल्याबाईवर, मी नाहीं शस्त्र हें धरायाचा ।
होईन साह्य तिजला, " धैर्य-रहित होय तैं रघू साचा ॥ ४२ ॥

या समयींच पुण्याहुन, आज्ञापत्रास धाडि माधव ही ।
" बाई मुखत्यार असे, मन माने राज्य तें करो स्त्री ही ॥ ४३ ॥

( युग्म ) याला कोणी व्यत्यय[8] केला असतां , तयास शासन[9] मी ।
करण्यास सिद्ध आहें " तत्पत्राला[10] सती बहूत नमी ॥ ४४ ॥

तेव्हां करि निश्चय ती, गंगाधरसह रघूपतीचा ही ।
उतरवितेंच नक्षा[11] " बोलुनि युद्धार्थ चालली सति ही ॥ ४५ ॥

" सरदार साह्य नसतां, युद्धीं जय लाभणें बहू कठिण ।
आहे तुकोजि योद्धा, नेइल सिद्धीस आपलाच पण ॥ ४६ ॥

---

१ क्षिप्रानदीच्या कांठीं २ आपल्या मस्तकाला ३ अहल्याबाईच्या पायांवर ४ आशीर्वाद ५ अलिकडे ६ माधवराव शिंदे ७ अहल्याबाई ८ अडथळा ९ शिक्षा १० माधवरावाच्या पत्राला ११ खोडकी

माधवरावाचेंही, अनुमोदन या नसेच कृत्यास ।
स्त्रीशीं युद्ध करुन मी, डाग कसा लावुं हा स्ववंशास" ॥ ४७ ॥

ऐशा पोक्त विचारा, राघोबानें मनांत मग केलें ।
धाडुनि कारकुनाला, तुकोजिरावास हें असें पुसिलें ॥ ४८ ॥

"मालीराव मृती-स्तव, दुःखवटा घेउनी समाचारा ।
आलों आहें तुमचा, हेतू युद्धार्थ भासतो सारा" ॥ ४९ ॥

तेव्हां तुकोजिरायें, उलटुन दादास धाडिलें पत्र ।
"सेना कशास संगें, प्रभुवर्यें आणिली असो तत्र ॥ ५० ॥

देतों धाडून तुह्मां, येण्याला पालखी सुखें यावें ।
हें राज्य असे तुमचें, दासजनांवरि कृपा करा भावें ॥ ५१ ॥

विप्राऽऽशीर्वाद मला सुख देउनि कीर्तिचाहि वर्धिष्णू ।
होवो ऐसी इच्छा, सद्विप्रचि तो अह्मां जनां विष्णू" ॥५२॥

जावा सर्वहि संशय, ह्मणुन रघू पालखींत बैसून ।
आला सडा, तुकोजी, सन्मुख जावोनि त्या करी नमन ॥ ५३ ॥

दोघे दुःखी झाले, कंठ भरुनिही तसेंच दोघांना ।
आले इंदूरीं मग, प्रासादाजवळ ठेवि दादांना ॥ ५४ ॥

( मालिनी. )

उपकृति करणाऱ्या साध्विचा कारभारी ।
उलटुन पडलों हें जाहलें पाप भारी ॥
मसलत फसली हें जाणुनी तो[११] मनांत ।
मग यति[१२] बनलाही राहि रानोवनांत[१३] ॥ ५५ ॥

---

१ अनुमत २ सगळा ३ महाराजांनीं ४ तेथें ५ सेवकावर ६ ब्राह्मणाचा आशीर्वाद ७ वाढविणारा ८ चांगला ब्राह्मणच ९ राजवाड्याजवळ १० उपकार ११ गंगाधर १२ संन्याशी १३ खानदेशांतील अणकुवाईच्या रानांत.

( स्रग्धरा. )

आलीं साह्यास सैन्यें ह्मणुन सति तया-लागिं हो मेजवानी ।
देई आनंदयुक्ता सुकनक[1]-कटकें देउनी त्यांस वानी ॥
गेलीं स्वस्थानिं सैन्यें स्तवन करित त्या साध्विचें स्थानस्थाना ।
भारी कौशल्य[2] दावी सकल जन मुदें वाटिती शर्करांना ॥ ५६ ॥

( मालिनी. )

वसुन रघुपती तो त्या स्थळीं एक मास ।
निरखुन वरतांना त्यास वाटेच खास ॥
जननिपरि जनाला वाटते साध्वि मानी ।
अवन करि तयांचें पुत्र-प्रेमा धरूनी ॥ ५७ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

हीशीं वैर खरें करीन तर मी पावेन संत्रास तो ।
कांहीं लाभ नसून खेद मजला होईल संप्राप्त तो ॥
या साठीं निघुनी स्वयें निजपुरा जावें असे हें बरें ।
साध्वीला पुसण्यास तो मग निघे माहिष्मतीला[3] त्वरें ॥ ५८ ॥
तेथें एक कथा बरीच घडली आश्चर्य-युक्ता[4] पहा ।
राघोबा बघुनी तिच्या धनचया[5] लोभिष्ठ झालाचि हा ॥
मागे द्रव्य तिला परंतु सतिनें द्या दक्षिणा बोलुनी ।
आणाया जल धाडिलें, परि नसे तो[6] मान्य लाजे मनीं ॥ ५९ ॥
' देतों युद्ध ह्मणे रघूपती तदा बोले सती त्यास ती ।
आहें सिद्ध, करा रणास, धन न्या जिंकून मातें अती ॥
तेव्हां तो लढण्यास सिद्ध बनुनी युक्ती सतीनें नवी ।
योजोनी फशिं पाडिला रघुपती मानसही वांकवी ॥ ६० ॥
केल्या सज्ज स्त्रिया तिनें जलदिनें त्यांशीं लढाया स्वयें ।
बांधी कंबर तो रघूपति रणा[9]-प्रीत्यर्थ भूमीसं[10] ये ॥
पाहोनी अबला[11] मनात दबला[12] तैसाच ओशाळला[13] ।
साध्वीला वदला जसें गमतसे वाटा धनाला, चला ॥ ६१ ॥

**राज्य संकट नामक ८ वा अंक समाप्त.**

---

१ सोन्याचीं कडीं २ चातुर्य ३ महेश्वराला ४ चमत्कारिक ५ खजिन्यास ६ रघुनाथराव ७ तयार ८ रघुनाथ रावाबरोबर ९ लढाईसाठीं १० रणभूमीस ११ स्त्रिया १२ बचकला १३ खिजला

# अंक ९ वा प्रारंभ.

## ( तुकोजि-सिंहासन-प्राप्ती. )

( स्रग्धरा. )

दादासाहेब गेले निघुन झडकरीं पुण्यग्रामास[1] जेव्हां ।
सत्याज्ञा[2] घे तुकोजी नृप-पदं[3] बघण्या तोहि गेलाच तेव्हां ॥
भेटे त्या माधवाला[6] पद-कमल नमी भेटिला ठेवुनी तो ।
गादीच्या मालकीची मिळवुन वसनें बोलला, त्यांस येतों ॥ १ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

तेव्हां माधवभूपती सचिवही नेमीच नारायण ।
राज्यालागिं, वदे तदा ' मज शिवा बाजीस द्या आपण ' ॥
' आज्ञा मान्य मला ' तुकोजि वदला वंदूनि त्या माधवा ।
घे आज्ञा निघण्या, निघे स्वपुरिला येण्यास राजा नवा ॥ २ ॥

( स्रग्धरा. )

घेवोनी कारभारी नवें, नवनृपती साध्विला भेटण्याला ।
आला माहिष्मतीला पद नमि सतिला सांगता सर्व झाला ॥
झाली सानंद साध्वी स्वकर फिरवुनी त्यास पाठीवरून ।
बोले ' जा राज्य पाहीं, सुखवि वसुमती, तूं प्रजा वत्स मान ॥ ३ ॥
आला तो इंदुराला सकल निजकरीं घेउनी राज्यसुत्रें ।
पाही राज्यास तेव्हां प्रकृति सुखविली त्या नृपानें पवित्रें ॥
मल्हारीची मृती ती कृति सकलहि त्या माजि मालीनृपाच्या ॥
पाडी तो विस्मृतीला प्रकृति मग मुदा पावल्या सर्व साच्या ॥ ४ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

यानें योग्य पराक्रमा करुनिया राज्यर्धि केली भली ।
श्रीमंतास करून साह्य बरवें कीर्तीहि संपादली ॥
अन्या मांडलिका नृपाकडुन हा खंडास घेई मुदें ।
जे होते नृपतुल्य त्या मदतिला देऊन संतोष दे ॥ ५ ॥

---

१ पुण्याला २ साध्वी अहल्याबाईचा हुकूम ३ माधवराव ( महतांपाद-शब्देन अंगमित्युच्यते बुधैः ) ४ नजराण्यास ५ वस्त्रें ६ माधवरावास ७ नारायण गोपाळ ( कारभाऱ्याचें नांव ) ८ इंदुराला ९ नवीन १० नवा राजा ११ आपला हात १२ प्रजा १३ आनंद १४ राज्याचा वाढ १५ समाम

हा राजा[1] चमके तदा नृप-पदीं[2] जैसा हिरा कोंदणीं
केलें तीस[3] सुवत्सरें[4] नृपतीनें तें राज्य मोठ्या क्षणीं ॥
कारस्थान करून थोर मिळवी तो द्रव्य आणि रसा[6] ।
राजे पाहुन यास धन्य ह्मणती, नाहीं यशस्वी असा ॥ ६ ॥

( स्रग्धरा. )

मानी माता सतीला, वचन प्रतिदिनीं पाळि मोठ्या प्रमोदें ।
तीही त्याला मुलाच्या-परि समजुनि हो वागली त्याशिं मोदें ॥
तो माई हाक मारी, परि सुदति तया पुत्र मल्हारिचा ही ।
बोले तैशीच केली खुणहि सुसतिनें मुद्रिकेच्या वरीही ॥ ७ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

नाहीं वाद विरुद्ध तीस शरदां[8]-मध्यें कधीं जाहला ।
त्या योगें सतिला प्रमोद गमला, आनंद याला[9] भला ॥
झाला प्राप्त असो महींप्रति[10] सुधी[11] पाळावया लागला ।
एकेवेळिं जराच गैर घडलें, बोले सती त्याजला ॥ ८ ॥

( शिखरिणी. )

'शिवा बाजीला तूं मज न पुसतां ठेवुन दिलें ।
कसें श्रीमंताच्या-जवळ' सतिनें त्यास पुसलें ॥
तदा नारोपंता प्रतिनिधि-पदां[12]-पासुन तया ।
सती काढी बोले पुनरपि तुकोजीस सदया ॥ ९ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

'घाली दौलत मी घरांत तुमच्या केलें तुह्माला धनी ।
कीं कांहीं मन हें तुझें मजकडे ओढेल हेतू मनीं ॥
नाहीं वाटत कीं तुझ्या कडुन हा हेतु पुरा होइल ।
जा आतां प्रभु तो समर्थ मजला येथें मुदें रक्षिल' ॥ १० ॥
साध्वीची अतिक्रोध[13]युक्त पडतां कर्णीत शब्दावली[14] ।
बोले बाबरुनी तुकोजि 'चुकलों' तोंडांतही घेतली ॥
"काकाच्या हुकुमास मानुन सदा सेवा मुला-सारखी ।
केली तत्फल[15] हें परंतु कधिंही बुद्धी नसे पारखी ॥ ११ ॥

---

१ तुकोजी २ सिंहासनीं ३ तीस (३०) संख्या ४ वर्षें ५ आनंदानें ६ पृथ्वी ७ शिक्यावर ८ वर्षांत ९ तुकोजीला १० पृथ्वीला ११ सन्मती १२ प्रधानाच्या अधिकारावरून १३ मोठ्या रागाची १४ शब्दपंक्ति १५ त्याचें फल ( सेवा केल्या-बद्दल राज्यलाभ झाला हा अर्थ. )

काका[१] आणिक माउली[२] मजप्रती आहां स्वयें आपण ।
पोटीं घालुनी ही चुकी मम[३] करा पुत्रा-परी रक्षण ॥
आज्ञाभंग[४] कधीं घडेल न पुढें हे देवि माझ्या करें " ।
बोलोनी मग पाय घट्ट धरिलें, साध्वी वदे ऊठ रे ॥१२॥

तेव्हां त्यास म्हणे सती " पुनरपी होऊं नये चूक रे ।
बोलोनी फळ काय वागुन तसा दाखीव जा सत्वरें ॥
इंदूरास करी प्रजा-जन सुखी मामाजिच्या[५] ही यशा ।
राखोनी स्वयशा-मुळें भर तया घाली बरें शुभ्रशा[६] " ॥ १३ ॥

( शिखरिणी. )

जरी त्या साध्वीनें नृपपदिं तुकोजी बसविला ।
तरी कारस्थानें परकि नृपतींची सुसतिला ॥
कळावीं तैसेंची वरमत हिचें घेउन तर ।
निकालाला लावी मग सकल कामें नृपवर[७] ॥ १४ ॥

हिनें त्याला सेनापति करुन सेने-सह तया ।
दिलें धाडूनीही कर[८] वसुल व्हावा ह्मणुनिया ॥
नृपांच्या-पासूनी कर जमवुनी हा नव नृप ।
सतीपाशीं धाडी, व्यय[९] करि सती योग्य सरूप ॥ १५ ॥

तिच्या-पाशीं होतें धन विपुल[१०] त्याच्या[११] स्वमतिनें ।
करावें खर्चाला बहुत करुनी दान सतिनें ॥
सदावर्तें तीर्था-प्रति परम रम्या[१२] असि कृती ।
करोनी देई ती सकल-जन-सौख्यास सुकृती[१३] ॥ १६ ॥

तुकोजीच्या चित्तीं कपट कधिं आलें म्हणून न ।
सदा वागे प्रेमें जननि[१४]-परि आज्ञेस धरुन ॥
सतीची होती त्या जरब[१५] बहु राजास नवल ।
घडे एका-काळीं परम जन एकोत सकल ॥ १७ ॥

---

१ मल्हारराव २ आई ३ माझें ४ हुकुम मोडणें ५ मल्हाररावाच्या ६ पांढऱ्या अशा ७ श्रेष्ठ राजा ८ खंड ९ खर्च १० पुष्कळ ११ धनाच्या ( खर्चाला ) १२ मनोहर १३ पुण्यवान १४ आईप्रमाणें १५ धाक.

( शार्दूल-विक्रीडित. )

देवीचंद ह्मणून एक कमला[1]-सत्पुत्र होता जया ।
मृत्यू येउन दौलतीस नव्हतें संतान कोणी तया ॥
हें जाणूनि तुकोजि तो तद्बला[2]-द्रव्यापहारी भला ।
झाला आणि तसा निरोप तिजला तेव्हां नृपें धाडिला ॥१८॥
हें ऐकूनि निवे महेश्वरि सती-पाशीं कथायास ती ।
सांगे सर्व कथा पदांस धुवुनी अश्रूजलें सन्मती ॥
झाली सद्गदिता[3] सती तिस ह्मणे बाळे सुखानें रहा ।
संपत्तीस धनीन तूंच असशी, क्षेत्रादिकें[4]ही पहा ॥ १९ ॥

( उपजाति. )

सती तुकोजीस निरोप धाडी ।
प्रजा-धनाच्या हरणार्थ धाडी ॥
कां घालितां, दूर तळास द्यावें ।
क्षमेस याची मग तो[6]हि भावें ॥ २० ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

एका मांडलिकें नृपें कर दिला नाहीं, लढाईसही ।
राही तोच उभा ह्मणून नृपती[7] जिंकावया त्यासही ॥
भारी यत्न करी परी यश तया ना लाभलें यास्तव ।
साध्वीला लिहुनी असेंहि पुसलें सल्ला करूं का नव ? ॥२१॥
पत्रा पाहुनि लाल होउन लिही ‘मेलास तूं रे जरी ।
ऐशा या अपमान-कारक तहा इच्छू नये बा तरी ॥
वृद्धत्वास्तव धैर्य होत नसलें देतें लढाई स्वयें ।
एथें स्वस्थ बसावयास तुजला बोलावितें तूंच ये ’ ॥ २२ ॥
गेलें पत्र तसें तुकोजि-सुत[9]-ही साह्यार्थ धाडी सती ।
संगें सैन्य धनास देउन, पुढें संग्राम झाला अती ॥
धाकानें बहु झुंजतां[10] मग तया तेव्हांच लाभे जय ।
शत्रू खंड तयास देउन नमी, नांदे सुखें निर्भय[11] ॥ २३ ॥

---

१ लक्ष्मीपुत्र (श्रीमान) २ देवीचंदाच्या स्त्रीच्या द्रव्याचा अपहार करणारा ३ गहिंवरलेली ४ क्षेत्रें, तीर्थे वगैरे ५ धाड ६ तुकोजीरावही ७ तुकोजीराव ८ ज्ञातारपणामुळें ९ तुकोजीरावाचा मुलगा ( काशिराव ) १० लढतां ११ निर्धास्त

( स्रग्धरा. )

सत्याज्ञा[1] नित्य, पाळी अवन[2] प्रकृतिचें[3] फार प्रेमें करी तो ।
नाहीं द्रव्यार्थ किंवा अधिकृति[4]-करितां भांडला साध्विशीं तो ॥
ऐशा त्या स्वात्म[5]-निष्ठा-प्रति बघुन सती फार पावेच मोद[6] ।
वंशाचें तैं स्वताचें हित करि नृपती फार पावे प्रमोद ॥२४॥

( आर्या. )

अधिकार-धनप्राप्ती-साठीं जगतीं अनंत संग्राम[7] ।
झाले आजवरी बहु, तुकोजि अपवाद कीं दुजा **राम** ॥ २५ ॥

**( तुकोजी-राज्य प्राप्ति नामक ९ वा अंक समाप्त. )**

---

## अंक १० वा.

### ( तीर्थ यात्रा. )

( आर्या. )

रघुनाथ पेशवा तो, होळकरांचें हरावया राज्य ।
सचिवास[8] साह्य घेउन, यत्न करी परि वृथाच तें प्राज्य ॥ १ ॥
त्या-समयीं माधव-स्त्री, साध्वि **रमा** फार फार उपयोगी ।
अहल्येस पडे हो, त्याच मुळें ह्या धनादिका भोगी ॥ २ ॥
तेव्हां-पासून सती, आणि रमाबाइ या उभयतांचा ।
प्रेमा फारचि वाढे **सीता**-सतिचा जसा **सुरमेचा*** ॥ ३ ॥
अहल्या- बाईला, साध्वि **रमा** ती प्रसू[9]-परी मानी ॥
हीहि तिला कन्येपरि, मानुनि करि लोभ फार अभिमानी ॥४॥
प्रतिमासी सद्वृत्ता[10], कळवुनि भेटीहि धाडिती फार ।
उंची वस्त्रें कधिं कधिं, नग[11], रत्नांचे तसें कधीं हार ॥ ५ ॥
औदार्य[12] शुद्धतादिक[13], गुण होते या सतिद्वया[14]पाशीं ।
प्रतिमासीं[15] रमणीयां[16],कृति ऐकुनि तोष[17] हो उभयतांशीं ॥६॥

---

१ साध्वीचा हुकुम २ रक्षण ३ प्रजेचें ४ अधिकारासाठीं ५ आपल्याठिकाणीं भाव ज्याचा अशाला ६ आनंद ७ लढाया ८ गंगाधरास ९ आई १० कुशलवृत्तास ११ दागिने १२ उदारत्व १३ पवित्रपणा वगैरे १४ ह्या दोन साध्वी स्त्रियांपाशीं १५ दरमहा १६ सुंदर १७ आनंद *विभीषण पत्नीचा

स्त्रीचा स्वभाव भारी, परोत्कर्षासहिष्णु[1] विधि[2] करितो ।
परि या सतीद्वयाचा[3], निर्मत्सर तो करून सुख बघतो ॥ ७ ॥
ऐसें जनांस भासे, प्रेमा दोघींमधें बहू वाढे ।
आमरणांताचि[4] राहे, इक्षु पुढें गोड जो प्रथम वाढे ॥ ८ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

होता अल्पवयी तरी प्रकृति जो पाळी दिलीपा-परी ।
आले दांतिं तृणा धरून शरणा ज्या माधवाला अरी[5] ॥
राहे माधव थेउरीं क्षय जया होऊनी रुग्ण-स्थिती[6] ।
झाली प्राप्त असा गजानन-पदीं ठेवूनि श्रद्धा अती ॥ ९ ॥

( स्रग्धरा. )

जेव्हां मुक्काम त्याचा स्वनगरिं असुनी फक्त होता अजारी ।
येती तैं भेटण्याला नृप-वर दुसरे मांडलीकादि[8] भारी ॥
बाई तेव्हां अहल्या सदय नजर ती वेइ संगें निघाली ।
वाटे तैं त्या रमेला मम जननि[9] मला भेटण्या-लागिं आली ॥१०॥
दोघींची भेट झाली, हृदय भडभडे दोघिंचे नेत्र झाले ।
सांश्रू[10] कंठांत घाली, मिठि मग सतिला ती रमाबाइ बोले ॥
'सासू माझी अनंदी रघुपति-वनिता भांडुनी मांडि दावा ।
ईशानेंही पतीला शयनिं निजविलें, त्रास कोणा वदावा ॥११॥

( शार्दूल-विक्रीडित. )

होतां कांहिं अनिष्ट[11] जाइन पतीसंगें सती मी त्वरें ।
हे मांते[12] मज भेटुनी सुखविलें झालें बहू हें बरें' ॥
तेव्हां संकटिं पाहुनी बहु रमा केलें समाधान ही ।
साध्वीनें तिजला असें सुचविलें दुःखाऽऽवृता[13] ही मही[14] ॥ १२ ॥
प्रासादीं[15] सुसतीस ठेवुन दिलें, तेव्हां तिच्या दर्शना ।
येती लोक असंख्य वंदिति तिला, साधूच वाटे जना ॥
'सन्मार्गी[16] मनुजा[17] अनंत मिळतो सन्मान भू-मंडळीं ।
जातां स्वर्गि तयास सौख्य मिळुनी मुक्ती मिळे चांगली ॥ १३ ॥

---

१ दुसऱ्याचा उत्कर्ष सहन न करणारा २ ब्रह्मदेव ३ रमाबाई व अहल्याबाई यांचा ४मरेपर्यंत ५शत्रू ६ आजाऱ्याची स्थिती ७ आपल्या(पुण्यांत) ८ मोठे राजे ९ आई १०आसवांनीं डबडबलेले ११ वाईट १२ आई १३ दुःखानें भरलेली १४ पृथ्वी १५ राजवाड्यांत १६ चांगल्या रस्त्यानें जाणारा ( सुमार्गी ) १७ मनुष्याला.

आनंदी करि नित्य मत्सर हिचा[1] रूपाभिमानी[2] कुधी[3] ।
नाहीं भेटली हीस ती अगदिंही धाडी बवाया सुधी[4] ।
दासी येउनि सांगतां, तिजप्रती सौंदर्य नाहीं तिला ।
आहे तेज परंतु दिव्य तिजला देवीच भासे मला ॥ १४ ॥

( आर्या. )

श्रीमंत माधवाला, देवाज्ञा होउनी प्रजा दुःखी ।
झाली पतिच्यासंगें, सति जाउनि ती रमा बहूत सुखी ॥१५॥

परमोदार[5] धन्याला, सद्गुण[6]-मंडित तशीच तज्जाया[7] ।
माता मज जी मानी, यम नेई काय तीस हो निर्दया ॥१६॥

पाहूनि या प्रसंगा, बहु दुःखित खिन्न होउनी साध्वी ।
झाली विरक्त अगदीं, यात्रा करण्यास लागली बरवी ॥ १७ ॥

घेई निरोप मग ती, कुल-दैवत-दर्शनार्थ हो आली ।
जेजूरीस पुढें मग, दक्षिण-यात्रा करावया फिरली ॥ १८ ॥

नियमित[11] जन संगें घे, अन्य जनांना महेश्वरीं धाडी ।
क्षेत्राप्रति कांहितरी, नूतन[12] सत्कृत्य ती करुन सोडी ॥ १९ ॥

पर्वत-कड्यावरूनी, विपिनांतुनि[13] पादचारि[14] होऊन ।
जावें लागे पूर्वी, अग्निरथानें[15] प्रवास नच कठिन ॥ २० ॥

आळंदी देहूला, जाउन मग पंढरी-प्रती गमन ।
केलें तिनें सतीनें, विठ्ठल-मूर्तीस पाहतां नमन[16] ॥ २१ ॥

औंदुंबरांत दत्ता,-प्रति नमुनी करविराकडे जाया ।
झाली सिद्ध तिथें ती, पाही बहु रम्य विष्णुची जाया ॥ २२॥

गोकर्णास शिवाचें, दर्शन घेऊन गेलि पंपेला ।
जेथुन राम सलक्ष्मण, मारुतिनें ऋष्यमूकीं हो नेला ॥२३॥

---

१ अहल्याबाईचा २ रुपाचा आहे गर्व जिला अशी ३ दुर्बुद्धी आनंदीबाई ४ बुद्धिमान्-दासी ५फार उदार ६ सद्गुणी ७ माधवरावाची स्त्री ८घरास ९खंडोबाच्या दर्शनार्थ १० दक्षिण हिंदुस्थानांतील तीर्थयात्रा ११ मोजके १२ नवें १३ अरण्यांतून १४ पायानें चालणारा १५ आगगाडीनें १६ नमस्कार १७ महालक्ष्मी ( अंबाबाई ) १८ ऋष्यमुक नांवाच्या पर्वतावर.

रामेश्वरा-प्रती मग, जाई ती साध्वि हो जगन्नाथीं ।
स्नानादिक[1] करुन तिनें, ठेवविलीं तत्पदीं[2] स्वसह[3] माथीं ॥ २४ ॥
यापरि दक्षिणयात्रा, संपवुनी पश्चिमेस ती गेली ।
डाकूर सोमनाथा, पाहुन सानंद[4] द्वारका झाली ॥ २५ ॥
काशी गया प्रयागा, मथुरादिक सर्व उत्तरेकडलीं ।
क्षेत्रें तीर्थस्थानें, पाहुन साध्वी घरीं परत आली ॥ २६ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

कोठें जीर्ण[5] सुमंदिरें[6] सति करी, कोठें नवीं बांधिलीं ।
कोठें घाट नदी-तटाक बघुनी बांधी सुधी मावली ॥
कोठें गांग[7] जला शिवा प्रतिदिनीं कोठें प्रपा[8]ही करी ।
वापी[9] धर्मगृहें[10] कुठें करवुनी संतुष्टता ती वरी ॥ २७ ॥

( वसंत-तिलका. )

यात्रेस जात असतां गिरिकंदरीं[11] जे ।
बैसूनि नित्य करिती तप मानसीं जे ॥
पाहूनि साधु करि साध्वि प्रणामे[12] त्यांना ।
घेई प्रसाद मग जाइच अन्य-स्थाना ॥ २८ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

मोठा कर्मठ विप्र[13] एक सतिनें संगें पुराणाप्रती ।
सांगायाप्रति घेतला प्रतिदिनीं ऐके कथा ती सती ॥
ऐसा नित्य असे प्रवास-क्रम[14] त्या साध्वी सुधीचा अहो ।
ऐकोनी सकला जनांस सुमती[15] होवो तसें सौख्य हो ॥ २९ ॥

( आर्या. )

ज्यांच्या ज्यांच्या हद्दी,-मध्यें तीर्थें पवित्र हीं होतीं ।
त्या राजांनीं तिजला, भेटुनि अत्यंत सुखविली सुसती ॥ ३० ॥
साध्वीनेंहि तयांचें, जाणुनि उपकार मान-पानास ।
केलें, त्यांना तोषवि, भोजन-दानें जसें सुविप्रांस[16] ॥ ३१ ॥

---

१ स्नान वगैरे २ जगन्नाथाच्या पायांवर ३ आपल्या ( मस्तका) सह ४ आनंदित ५ जुनीं ६ चांगलीं घरें ७ गंगेच्या ८ पाणपोई ९ विहिरी १० धर्मशाळा ११ पर्वतांच्या गुहांत १२ नमस्कार १३ ब्राह्मण १४ प्रवासांतील वागण्याची रीति १५ चांगलीबुद्धि १६ चांगल्या ब्राह्मणांना.

( मंदाक्रांन्ता. )

साध्वी तीर्थें करित असतां, दुष्टवार्ता[1] सतीला ।
ऐकूं आली रघुपति वधी भ्रातृजाला[2] मुलाला ॥
बैसे गादीवर मग कुधी[3], ऐकुनी त्यास शापी ।
"पापी जावो निरयिं[4] असला, जो स्ववत्सास[5] कापी" ॥ ३२॥

आर्या

साध्वींनें त्यासमयीं, भविष्य केलें बुडेल गादी ही ।
श्रीमंताची ऐसें, सतिच्या वचनापरीच घडलें ही ॥ ३३ ॥

( युग्म )

राघोबास करावें, भ्रष्ट पदापासुनी[6] तया स्थानीं ।
गंगाबाइ सतीला, आपण बसवूं असेंच सर्वांनीं[7] ॥ ३४ ॥
ठरवून पत्र त्यांनीं, धाडुन दिधलें तुकोजि- रावाला[8] ।
इंदूरास सतीला, बोलावुन तोहि मग पुण्या गेला ॥ ३५ ॥

( शार्दुल-विक्रीडित )

झाल्या भानगडी बहूत तिकडे, सर्वांमध्यें हा भला[9] ।
होता, काढि रघू, तिथें बसविली गंगासती कोमला ॥
झाला पुत्र तिला, तयास बसवी सिंहासनीं त्याजला ।
देई नाम सवाइ माधव असें, रामापरी भासला[10] ॥ ३६ ॥

( तीर्थ-यात्रा नामक दशम अंक समाप्त )

---

## अंक ११ वा.

### राज्येक्षण

( आर्या. )

सरजान माल्कम हे, भारतमध्यांधिकारि[11] जे होते ।
सतिची धृती[12] स्तुति[13] मती[14], ऐकुनि शंकीत जाहले हो ते ॥ १ ॥
शोधक साहेब पुरे, वास्तवस्थिति[15] शोधिली तयांनीं ती ।
तेव्हां आढळलें त्या, सत्य असे मति, धृति तशीच स्तुती ॥२॥

---

१ वाइट बातमी २ पुतण्याला ३ दुर्बुद्धि ( रघुनाथराव ) ४ नरकांत ५ आपल्या मुलास ६ सिंहासनावरून ७ सव कारभाऱ्यांनीं ८ तुकोजीराव ९ संभावित १० वाटला ( रामासारखी कृति होती किंवा केली ह्मणून ) ११ मध्यहिंदुस्थानांतील मुख्य अधिकारी १२ धैर्य १३ प्रशंसा १४ बुद्धि १५ खरीस्थिति.

मध्य[1]-भरत-खंडाचा, त्यांनीं[2] इतिहास चांगला लिहिला ।
त्या-मध्यें स्तुति करुनी, न्यायी-नृप-श्रेष्ठ[3] मानिलें इजला ॥ ३ ॥
अंगीं सद्गुण असतां, स्वकीय परकीय मानिती पूज्य ।
जैसें बहु प्रिय सकलां, स्वादु[4] सुरभि[5] वाटतेंच तें आज्य * ॥ ४ ॥
ऐहिक कीर्ती होउनि, परलोकीं मुक्ति लाभते बरवी ।
फल पुण्याईचें हें, सत्स्पर्शें[6] रविहि[7] धन्यता मिरवी ॥ ५ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

राज्याचा अधिकार घेउन करीं, पाहावया लागली ।
तेव्हां लौकिक ऐकुनी सचिवं[8], गोविंदपंता दिली ॥
या प्रामाणिक राज-नीति निपुणा-पासून तें फायदे ।
झाले फार, जुने दुरुस्त करुनी केले नवे कायदे ॥ ६ ॥

( स्रग्धरा. )

सारा नेमस्त घ्यावा सुपिक नरम भू पाहुनी धोरणानें ।
हक्कांलाही[9] जपावें परम कुलिन त्या पाटलांच्या; प्रधानें ॥
प्रत्येकीं तो महालीं सदय[10] नर जना सौख्य द्यायास नेमी ।
ऐसी सौख्यर्द्धि[11] केली नव-सचिव-वरें[12] फार तैं ग्रामग्रामीं ॥ ७ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

होते भिल्ल तसेंच गोंड दुसरे राहून ते पर्वतीं ।
लोकांना लुटती तशाच करिती चोऱ्या बहू दुर्मती ॥
चौक्या बैसवुनी तयांस धरुनी मोडी सती खोड ती ।
धंदे देउन त्यास पोट भरण्या संतुष्ट केलें अती ॥ ८ ॥

( आर्या. )

बैलामागें अर्धा, पैसा कर घ्यावया तयांस सती ।
देई आज्ञा त्याला, 'भिलकवडी' सर्व जन तदा वदती ॥ ९ ॥

( मालिनी. )

पडित जमिन त्यांना देउनी ती इनाम ।
पंथें[13][14] अवन कराया त्यांस नेमी तमाम ॥
अट करि जर चोरी जाहली त्या महालीं ।
भरुन अगर पत्ता देउं आह्मी तुह्मांला ॥ १० ॥

---

१ मध्य हिंदुस्थानाचा २ माल्कम साहेबांनीं ३ न्यायी राजांत श्रेष्ठ ४ गोड ५ सुवासिक * तूप ६ साधूच्या स्पर्शानें ७ सूर्य सुद्धां ८ प्रधानकी ९ पाटलांच्या हक्कांला प्रधानें जपावें १० दयाळू ( कामगार ) ११ सुखाची वाढ १२ नव्या श्रेष्ठ प्रधानानें १३ रस्ते १४ त्या प्रदेशाला.

( शार्दूल-विक्रीडित. )

झाले तुष्ट बरेच गोंड परि ते कांहीं जरा रुष्ट[1] ही ।
त्यां-मध्यें मनरूप सिंग कपटी होता अती दुष्टही ॥
लोकांना लुटुनी करी कधिं कधीं प्राणान्त[2] ही हेतिनें * ।
त्याला ठार करून लोक सगळे सानंद केले तिनें ॥ ११ ॥

( आर्या. )

केला भिल्लांपासुन, होणारा त्रास नाहिंसा त्यांनीं[3] ।
लोकांस न्याय देणें, नृप-कर्तव्यांस ती मनीं मानी ॥ १२ ॥
लोकांच्या अर्जांचा, निकाल करण्यास पंच अधिकारी ।
ग्रामीं नेमी साध्वी, न्यायाधिश मुख्य[4] नेमिला शहरीं[5] ॥ १३ ॥

( शार्दूल-विक्रीडित )

कोणी अर्ज तिच्याकडे जर स्वतां घेऊन गेला तरी ।
तो घेई करि चौकसी, किमपिही दुर्लक्ष ती नाकरी ॥
न्यायाला करुणेस चित्तिं धरुनी पाही पुरावा खरा ।
लोकां न्याय मिळे खरा, सुमतिनें ध्यावें सदा ईश्वरा ॥ १४ ॥

फांशींची बहुधा न देइ सदया कोणास शिक्षा कधीं ।
बोले " ईश्वरनिर्मिताप्रति कसें मारूं स्वयें मी सुधी ॥
त्याचा जाब मला तयास दिधला तो पाहिजे हो वरी ।
आहे मृत्यु मला " ह्मणून न सती देहान्त[6] शिक्षा करी ॥१५॥

बाजीराव पुण्यास फार जनता[8] येवोनि राहो असें ।
चित्तीं आणुनि बांधण्यास सुगृहें भूमी तिर्ला देतसे ॥
तैसें इंदुर वाढण्यास करुनी योजीहि युक्ती नवी ।
प्रासादास[9] [10]मधें तसें द्विजगृहां वाप्यादिका[11] बांधवी ॥ १६ ॥

( आर्या. )

राहे महेश्वरीं जरि, तरि साध्वीची कृपा असे शहरीं[12] ।
संपन्न इंदुरानें, व्हावें इच्छुन उपाय फार करी ॥ १७ ॥

---

१ रागावले २ प्राणनाश ३ प्रधान व अहल्याबाई यांनीं ४.५ मुख्य शहरांत ह्मणजे इंदुरांत ६ फांशींची ७ लोक-समूह ८ जनतेला ९ राजवाड्यास १० गांवाच्या-मधें ११ विहिरीं वगैरे १२ इंदुरावर * तरवारीनें

प्रकृति-धनाचें रक्षण, करण्याला दक्ष ती असे भारी ।
आंग्लां-परी करांनीं, रयतेला क्षीण ती मुळीं न करी ॥ १८ ॥
खंडेराव कमाविस-दारीचें काम इंदुरीं पाही ।
नियमित वसूल जमवी, जन सुखवी सकल तोषवी ही[1] ही ॥१९॥

( स्त्रग्धरा. )

ठेवी सैन्यास थोडच्या अवन[2] अवनिचें[3] व्हावया इंदुरांत ।
बाकीची तीं[4] तुकोजी-नव नरपतिच्या-पाशिं हो दक्षिणेंत ॥
होतीही उत्तरेला चकमाकि करण्या गुंतलेली जराशी ।
अन्यायाला मिळेना स्थळ ह्मणुन पळे बापडा दूरदेशीं ॥ २० ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

सन्मार्गीं प्रकृती-प्रती वळविण्या योजी दया दंड ती ।
पाही मंतु[5] करी दया जर असे तो अल्प[6] तेव्हां सती ॥
मोठ्याला करि दंड धाक सकला होता सतीचा अती ।
खंडालाहि नृपाळ धाडिति सती मातेपरी मानिती ॥ २१ ॥

( स्त्रग्धरा. )

राज्याचीं सर्व सूत्रें करिं धरुन स्वतां राज्य पाहावयाला ।
लागे तेव्हां सती ही नृपपदिं बमुनी सर्व कामें नयाला * ॥
चित्तीं ठेवूनि पाही नजर[7] कधिं न घे ती प्रजेच्या-कडून ।
कोणाला घ्यावयाला अनुमति[8] कधिंही साध्वि देई तसें न ॥ २२ ॥

( आर्या. )

नजराणा घेण्याची, लालुच[9] मनुजास लागल्या-वरतीं ।
अन्याय व्हावयाचा, संभव असतो असें ह्मणे सुदती ॥ २३ ॥

( भुजंग-प्रयात. )

असो लक्ष किंवा असो कोटि देवी ।
प्रजेच्या धनाला न लोभास दावी ॥
सिरोजीं कुबेरा-परी खेम[10] थोर ।
असे एक विख्यात तो सावकार ॥ २४ ॥
परी तो अकालीं यमानेंच नेला ।

---

१ अहल्याबाई २ रक्षण ३ पृथ्वीचे ( राज्याचें ) ४ फौज ५ अपराध ६ थोडा ७ नजराणा ८ रुकार ९ गोडी १० खेमचंद * न्यायाला

वधू दत्तकाला दिराच्या सुताला ॥
स्वयें घेउनी पाहवी कारभार ।
परी आड आला कमावीसदार ॥ २५ ॥

वदे "तीन लक्षास द्यावें धनाला ।
असें होइना मी तरी जप्त माला ॥
करूनी तुह्मां लाविंतों हो भिकेला" ।
तदा ती[2] स्वदुःखा कथी या सतीला[3] ॥ २६ ॥

सतीच्या पदीं ठेवुनी मस्तकाला ।
कमावीस-दाराचिया भाषणाला ॥
कथीं, दत्तकाला खरें मानुनीही ।
कमावीस-दारास काढी सती ही ॥ २७ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

तापीदास दुजा बनारस असे भ्राते धनी त्यांजला ।
एकामागुन एक नेउन यमें संतोष तो मानिला ॥
तापीची वनिता[2] सतीस[3] वदली हें द्रव्य तुह्मांप्रती ।
अर्पावें मज वाटतें, सति वदे घेऊन जा संप्रती ॥ २८ ॥

त्याच्या योग्य व्यया तुला कथितसें, तैसा करी तूं स्वयें ।
बांधी तूं खरगोणि घाट नदिला तैशींच देवालयें ॥
आज्ञा मानुन ती करी सकलही नारी[4] तदा सन्मती[5] ।
श्रीलंबोदर-देवळासह तदा ती घाट बांधी कृती ॥ २९ ॥

( उपजाति. )

धर्माभिमानी जरि फार होती ।
तरी विधर्मीय[6] जना-प्रती ती ॥
करादिकांनीं[7] न कधींच त्रास ।
दिला, दिलें सौख्य खरें तयांस ॥ ३० ॥

---

१ बायको ( तापीदासाची ) २ तापीदासाची स्त्री ३ अहल्याबाईला ४ तापीदासाची बायको ५ चांगली बुद्धिमान ६ परधर्मी लोकांना ७ डोईपट्टी वगैरे करांनीं

( आर्या. )

जी पूज्य पद्धती त्या, अकबर यवनाधिपेंच[1] पसरविली।
ती त्या शिवाजि-रायें, लावुन दिधली तिलाच अनुसरली॥ ३१॥
जरि कारभार पाही, राज्याचा तरी तिच्या क्रमा-मध्यें।
नित्याच्या फरक नसे, भावें पूजादिका करीच स्वयें॥ ३२॥

( शिखरिणी. )

सदाचारी न्यायी समवनें[2] कराया प्रकृतिचें।
झटोनी जी मानी जन सकल माझे, जग जिचें॥
गुणांला गावोनी बहुत करितें स्तोत्र; चरित।
असें माल्कम हाही लिहिच इतिहासीं सुचरितें[3]॥ ३३॥

( शार्दूल विक्रीडित. )

राज्याच्या शकटा सुयंत्रित कसें हाकी सती हें जयीं।
वाटे गूढ परंतु शोध करितां आश्चर्य झालें तया॥
तो हा माल्कम[4] दुष्ट भाव परकी टाकून बोलेच मा*।
ही साध्वी नय-कीर्ति दान निलया[5] प्रत्यक्ष साधू नमा॥ ३४॥

( आर्या. )

निःपक्षपात आणी, न्याय तयांची जनास माय दिसे।
त्यजुन कुकर्में पार्वत[6], लागति वागावयास ते खासे॥ ३५॥
अधिकार्यप्रदेशामधिं[7], दंगा नाहीं कधींहि उद्भवला।
अधिकारी प्रकृति-वरी, नच करिती ते कधींहि जुलमाला॥ ३६॥

( शार्दूल-विक्रीडित. )

आली उन्नतिला प्रजा सकलहि वात्सल्य[8]-योगें जिच्या।
साधू-संत परी जिला नमुनिया गाती गुणां साध्विच्या॥
याचें कारण धर्म-भावें[9] सतिचा तैसी व्यवस्था अती।
साध्वीला स्तविती नृपाल परकी सत्कारिती वंदिती॥ ३७॥

**राज्ये-क्षण-नामक ११ वा अंक समाप्त.**

---

१ मुसलमानी बादशहानें २ सांभाळ ३ चांगले चरित्र ४ माल्कमसाहेबाला ५ न्याय कीर्ति आणि दान यांचे घरच असी ६ पर्वतावरील कोंड, भिल्ल वगैरे ७ आपल्या ताब्यांतील प्रदेशांत ८ दयाळुपणा ९ धार्मिकपणा * आई

# अंक १२ वा.

## ( अन्य[१]-नृप-व्यवहार )

### ( उपजाति. )

दया क्षमा आणि तशीच शांती ।
निर्लोभता ठेवुनी-ही स्वचित्तीं ॥
वागावया जे झटतातही त्या ।
ही[२] वंद्य होती सकला अहल्या ॥१॥

### ( शार्दूल-विक्रीडित. )

नीतीनें स्वँ[३]-करास अन्य नृपतीं-पासून घेइ सती ।
कोणा मांडलिका-कडून ठरल्या-पेक्षां न मागे अती ॥
तेही खंड विलंब तो न करितां, साध्वी-कडे धाडिती ।
माफी तो[४] जर होचैं[५] मागति तिला, होता दरारा अती ॥ २ ॥

### ( आर्या. )

सामंतांची[६] उन्नति, व्हावी ऐसें सदैव तच्चित्तीं ।
त्यांच्या आविकृति-हरणा, यत्न करी जो तयास शासी ती ॥३॥
प्रकृतिस सुखी करावें, राज्य-व्यवस्था तसी सुधारूनी ।
सल्लाहि द्यावयाला, तद्राष्ट्रीं वकिल नेमिले त्यांनीं ॥ ४ ॥
सामंतीं तुष्ट सदा, राहुनि राज्यास आपल्या त्रास ।
देऊं नये ह्मणुन ही, साध्वी त्या देइ कांहिं हक्कांस ॥ ५ ॥

### ( शार्दूल-विक्रीडित. )

साध्व्यौदार्य तशीच भीति दुसरी वाटूनि सामंत ते ।
साध्वीशीं बहु नम्र वागति कधीं दंगा करायास ते ॥
झाले सिद्ध न बोलती ' सतिप्रती द्यावें प्रभूनें अती ।
आयुष्यास, करो सदैव अवना बाई अहल्या-सती ' ॥ ६ ॥

---

१ दुसऱ्या राजांशीं वागणूक २ ही अहल्याबाई ३ आपल्या खंडणीस ४ विलंब ( अवकाश ) ५ झालाच ( तर ) ६ मांडलिकांची ७ भरभराट ८ मांडलिकांच्या राज्यांत ९ साध्वी-औदार्य ( साध्वीचें उदारपण )

( आर्या )

म्हैसूर, पुणें, दिल्ली; लखनौ, ग्वाल्हेर आणि कलकत्ता ।
हैद्राबाद, बडोदें; स्वतंत्र चाले इथें नृपति[1]-सत्ता ॥ ७ ॥

येथील नृपाळांशीं, नागपुराशींहि होइ व्यवहार ।
पत्रांचा, श्वशूराचे, तह पाळी ती करी न अपहार[2] ॥ ८ ॥

प्रतिदरबारीं सतिचा, होता एकैक चांगला वकिल ।
पदरीं विश्वासु चमू[3], असतां दंग्यास कोण हो करिल ॥ ९ ॥

मेवाडाच्या अळशी, राण्याच्या जात-भाइंनीं सतिचा ।
रामपुरा घेण्याचा, केला नच यत्न हो सफल[4] साचा ॥ १० ॥

ही बातमी सतीला, कळतां धाडी शरीफ भाईला ।
तो करि पराभवाला, नृप[5] मागे तो क्षमाहि मग सतिला ॥ ११ ॥

स्वतंत्र राजांमध्यें, महादजीशींच सख्य बहु होतें ।
श्वशुराचे[6] स्नेही ते, शूर तसे नीति-दक्ष[7]ही होते ॥ १२ ॥

शिंदा पराक्रमी तो, कारस्थानीहि चांगला असतां ।
परि त्यास महत्त्वाची[8], आकांक्षा[9] दुष्टगुण अती होता ॥ १३ ॥

एके वेळीं उसनें, त्यानें साध्वीकडून तिस[10] लक्ष ।
ते द्रव्य घेतलें हो, यास्तव साध्वी-वरी असे लक्ष ॥ १४ ॥

कोणी ऐसें वदती, परि खोटें हें मला दिसे वचन ।
औदार्य, धैर्य, दानत; पाहुन सतिच्या कडे वळेच मन ॥ १५ ॥

मुलकी आणी लष्कारि, लोकांना सक्त ताकिदी शिंदा ।
देई 'सत्याज्ञेला[11] पाळा न विलंब लावितांच सदा' ॥ १६ ॥

---

१ राजांचा अधिकार २ अभिलाष ३ सैन्य ४ केलेली खटपट वायां गेली ५ मेवाडचाराजा ६ मल्हाररावाचे ७ न्यायांत चतुर ८ मोठेपणाची ९ इच्छा १० तीस (३०) संख्या ११ अहल्याबाईचा हुकूम.

शिंद्यापरी दुजेही, राजे सतिचा बहूत सत्कार ।
करुनी पाळिती वचना, साध्वीची पूज्यता असे फार ॥ १७ ॥
श्रीमंत पेशव्यांना, राज्य-व्यवस्था बघून अभिमान ।
वाटे या बाईचा, माते-परि[1] हीस देति सन्मान[2] ॥ १८ ॥
टिप्पू[3] सुलतान दुजा, निजाम[4] आणी नवाब लखनौचा ।
कलकत्त्याच्या लाटेंहि[5], सदैव बहुमान ठेविती सतिचा ॥१९॥
हिंदितरें[6] नृपांचीही, साध्वी-विषयीं असी असे बुद्धी ।
मग जे हिंदू असती, त्यांना होईल काय दुर्बुद्धी ? ॥ २० ॥
साध्वीस दुःख देणें, ह्मणजे प्रत्यक्ष गोवधा[7] करणें ।
ऐसें मानिति राजे, मुक्तिप्रद[8] मानिती तिला नमणें[9] ॥ २१ ॥
बांधी परराज्यांतहि, वाप्यादिक[10] धर्मकृत्य नित्य सती ।
यास्तव सतीस निजपर[11]-भाव नसे ह्मणुनि मानिती नृपती ॥२२॥
श्रीमंतास सती ही मान बहू देउनी सदा वागे ।
हत्या[12] करून रघुपति, साह्य हिला नीच एकदा मागे ॥ २३ ॥
तेव्हां साध्वी त्याला, वदली यजमानें[13]-शत्रु तो माजा ।
शत्रू आहे यास्तव कैद करिन रे द्विजा[14] त्वरें पळ जा ॥ २४ ॥

**अन्य-नृप-व्यवहार-नामक १२ वा अंक समाप्त.**

---

## अंक १३ वा.

### दान-स्वभाव-दर्शन

(शिखरिणी.)

असंख्या लोकांची हरति यमुना ती सुरनदी[15] ।
किती पापें मोठीं ह्मणुन जन वानीच अगदीं ॥

---

१ आईप्रमाणें २ चांगला मान ३ ह्मसूरचा राजा ४ हैद्राबादचा राजा ५ गव्हर्नर जनरल ६ हिंदूहून इतर ७ गोहत्या ८ मुक्तिदेणारी ९ नमस्कार १० विहिरी वगैरे ११ आपलेपणा व परकीपणा १२ नारायणरावाचा खून १३ धन्याचा शत्रू १४ ब्राह्मणा ( रघुनाथा ) १५ गंगा.

अहल्याबाईची कृति तशिच होती वितरणीं[1] ।
जिला मानी वानी सुखदें[2]-कर-दानें-हि तरणी[3] ॥ १ ॥

( स्रग्धरा. )

देवस्थानास कोठें बहुत धन कुठें अन्नसत्रास स्थापी ।
कोठें धर्मार्थ शाळा करवुन सतिनें बांधिल्या थोर वापी ॥
रेवा-बाईस नामी प्रतिकृति[4]सह तो चांगला घाट बांधी ।
छत्री बांधी वरी ती स्मरण निज जना राहण्यालाहि साधी ॥ २ ॥

( शिखरिणी. )

गयेला जीं नामी बहुत दिसती धर्म-निलयें[5] ।
सती स्थापी तेथें प्रतिकृतिहि शुभ्रोपल[6] स्वयें ॥
तिला वंदी भावें जन सकल यात्रेकरु अती ।
करी जो सत्कृत्यें सुनर बनतो तो सुरपती ॥ ३ ॥

( स्रग्धरा. )

सांगावें काय जास्ती सुसति गुण-गणें[7] जाहली देव लोकीं ।
जन्म ती मानवांच्या कुळिं धनगरही पावली मान नाकीं ॥
ऐथें औदार्य दावी, सदय मन सदा लोक-सेवेस लावी ।
ज्या साध्वींची प्रशंसा मयुर-कवि करी मानुनी तीस देवी ॥४॥

( शार्दूल-विक्रीडित. )

झाली वंद्य द्विजांस जाउन बसे जी देवतांच्या स्रजीं[8] ।
शत्रूपासुन राज्य-रक्षण करी बांधी बहू दुर्ग[9] जी ॥
वीथ्यां[10], घाट, तलाव, धर्म-निलयें जीं देवळें बांधिलीं ।
त्यां मध्यें रमणीय दोन पुढचीं सर्वांहुनी जाहलीं ॥ ५ ॥

(आर्या.)

नेमावरास बांधी, कुल-दैवत[11]-देवळास दिव्य सुधी ।
सुंदर घाट तसा ती, जामीं विंध्याचल[12]प्रती बांधी ॥ ६ ॥
हीं आणी इतरस्थळें, साध्वी शिलकेमधून हो बांधी ।
या-साठीं कर दुसरा, प्रकृतिवरी[13] स्थापिना कधींच सुधी ॥ ७ ॥
दुष्काळ-फंड ‘ इनकमटॅक्स[14] ’ तिजा करहि तो मिठा-वरला ।
‘मिशनरि’ पोषक चौथा, यांनिं तिनें नाहिंहो स्वजन पिळला ॥८॥

---

१ दान देण्यांत २ सुखकर किरणांच्या दानानें (पक्षीं सुखदायक खंड देउन ) ३ सूर्य ४ प्रतिमा (पुतळा) ५ धर्मशाळा ६ संगमरवरा (पांढऱ्या दगडाची ) ७ गुणांच्या समुदायानें ८ माळेंत ९ किल्ले १० मार्ग ११ खंडोबा १२ विंध्याद्रिपर्वतावर १३ प्रजेवर १४ प्राप्तीवरचा कर.

कर्पट[1]-प्राप्ति-करांहीं, लवण[2]-करानें जना तिनें अपल्या ।
खासें खाया घालुनि, इतर प्रजा नाहिं हो कधीं पिळल्या ॥९॥
राज्यांतिल अर्ध-प्रजा, क्षुधितें[3] असुनिही नव्या करा बसवी ।
वसावया पर-राज्यें, '**फॅमिनफंडॉस**[4]' ही न ती पचवी ॥१०॥

( शार्दूल-विक्रीडित. )

या-साठीं सतिची खरी कृति असे, लोकांस सौख्या-प्रती ।
देवोनी करि दान-धर्म दुसऱ्या लोकोपकारा सती ॥
'लोकां-पासुनि शोषुनी जळुपरी काढूनि द्रव्या करी ।
जो कृत्यें नृपती गमे सकलिकां तो खास चोरा-परी' ॥ ११ ॥

( स्रग्धरा. )

सत्राशें नव्वदाच्या इसविंत पडला, फार मोठा दुकाळ ।
हिंदुस्थानांत तेव्हां बहुत जन हिनें वाचवीलेच, वेळ ॥
होती भारी जनाला कठिण जन मृती पावले फार जेव्हां ।
धान्याची पायली हो मिळत सकलिका रूपकोला[5]हि तेव्हां ॥१२॥

( मालिनी. )

प्रतिदिवशिं सती ही गो-प्रदानें हजार ।
करुन द्विजवरांना[6] तोषवी फार फार ॥
गरिब जन दुजे त्या अन्नवस्त्रांस वाटी ।
विमुख जन कधींही जाउं देई न कष्टी ॥१३॥

( आर्या. )

अत्यंत नीचँ[7] लोकां, सणवारीं वाढुनीच पक्कानें ।
देई खाया त्यांना, अंधाऽपांगासँ[8]ही तसीं अन्नें ॥१४॥
बैरागी, गोसावी यांना सत्रें बहूस्थळीं करवी ।
ठेउनि नोकर उष्णीं[9], वाटसरांना बहूत जल देई ॥१५॥
शिशिरीं[10] गरिब जनांना. वसनें[11] वाटावयास कारकुन ।
फिरवी राज्या-मध्यें औदार्यें कर्ण भासवी ऊन[12] ॥१६॥

---

१ कापडावरील जकात व प्राप्तीवरील कर यांनीं २ मिठावरील करानें ३ उपाशीं (भुकेलेली) ४ दुष्काळ-फंडास ५ एका रुपायाला ६ ब्राम्हण श्रेष्ठांना ७ अतिशूद्र वगैरे ८ आंधळ्या पांगळ्यांना ९ उन्हाळ्यांत १० हिंवाळ्यांत ११ वस्त्रें १२ कमी.

( इंद्रवज्रा. )

शेतामधें नांगर ओढतांना, ।
जे श्रांत झाले वृषभादि[1] त्यांना ॥
पाणी पिण्यालाहि मिळो ह्मणूनी ।
नेमीं सती सेवक फार रानीं ॥ १७ ॥

( शिखरिणी. )

पिकें शेतांमध्यें उभि असुनि खायास न मिळे ।
तयां पक्ष्यां हां हां बहु वदति केदार[2] सगळे ॥
ह्मणूनी पक्ष्यांच्या उदर-भृति[3]-साठींच सुसती ।
निराळी राखीही अवनि[4] सदया त्यांस महती ॥ १८ ॥

( उपजाति. )

नदी-तटाकीं असती स्थळें जीं ।
तेथील मत्स्यां[5]-प्रति घालि रोजीं ॥
गोळे पिठाचे रघुनाथ[6]-नांवें ।
घालून चारी सगळ्यांस भावें ॥ १९ ॥

( आर्या. )

प्रख्यात प्रभाकर-कवि, साध्वीच्या वेळिं हो असे भरतीं[7] ।
त्यानें कटाव करुनी, साध्वि-गुणांलाहि गाइलेंच अती ॥ २० ॥
सारांश सांगतों मी, त्या कवि-रायें असे कथन केलें ।
त्याचा, ध्यान असोद्या, सद्गुण[8] कोणा-प्रती न प्रिय झाले ॥ २१ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

"नाहीं धन्य इच्या-परी कलि-युगीं जी जेववी ब्राह्मणां ।
लक्षाहूनि अधीक कर्णहि तदा झाला नव्हे कां उणा ॥
कुंडें पेटवुनी तयांत द्विज ते तैं आहुती टाकिती ।
लग्नें तेलगुंची[9] करून मिरवी साध्वी वराती अती ॥ २२ ॥
दुग्धातें पुरवी स्तनं-धंय[10] मुलां, रोग्यांस पथ्यौषधी[11] ।
वृद्धांलों[12] वसनान्न[13] चालवि; द्विजा इच्छान्नें[14] घाली सुधी ॥
हातोंला[15] मठ अग्निहोत्र द्विज जो घेइल त्याला सती ।
बांधूनी मग सर्व सोयहि करी त्याची त्वरें सन्मती ॥ २३ ॥

---

१ बैल रेडे वगैरेंना २ शेतकरी ३ निर्वाहा-करितां ४ पृथ्वी ५ माशांना ६ रामाचीं नांवें (पिठाच्या गोळ्यांत चिठ्यावर लिहून घाली) ७ हिंदुस्थानांत ८ चांगलें गुण ९ तोलंगी ब्राम्हणांची १० तान्ह्या ( स्तन पिणाऱ्या ) ११ औषधपाणीं १२ म्हाताऱ्यांना- १३ अन्नवस्त्र १४ इच्छिलेलें अन्न १५ होम करणाराला.

( मंदाक्रान्ता. )

कोटी लिंगें[1] कधिं कधिं करी नित्य ऐके कथांना ।
एका हातीं धरि जपस्त्रजे[2] आणि साध्वी जपांना ॥
मोठ्या मोदें करि, प्रतिदिनीं वस्त्र यात्रे-करूला ।
जोडे[3] कोणा विपुल धन तें देइ पात्राऽऽदिकांला[4] ॥ २४ ॥

(वसंत तिलका.)

यात्रे-करू जर गरीब असेल त्याला ।
खर्चास सर्व सति देइ, सुपर्वणीला ॥
ती तेल, तूप अथवा गुळ आणि तील ।
यांच्या तुला द्विज-वरांस करी बहाल ॥२५॥
सौवर्ण[5] राजत[6] तुलांस कधीं द्विजांला ।
वाटी सती धन बहू गरिबां जनांला ॥
कोणास लग्न करण्या, व्रत उज्ज्वलाया ।
नंदादिपा प्रति कुणा गृहही कराया ॥ २६ ॥

( स्रग्धरा. )

साधूच्या दर्शनाला जशि जन[7]-तति हो नित्य येती नमाया ।
येती ते लोक भारी सकल-जन-पदां[8] हून साध्वी बघाया ॥
देवी मानूनि तीतें नमन बहु-मुदें तत्पदीं[9] ते करून ।
झालों निष्पाप आम्ही वदुन मनिं असें जाति यात्रा करून ॥२७॥

(आर्या.)

भारी लौकिक सतिचा, उभय-कुलोद्धार[10][11] साध्विनें केला ” ।
पाहुनि प्रभाकरें मी, लिहिलें घेऊं न कोणि शंकेला ॥२८॥

( स्रग्धरा. )

बाई भावें मुमारें धन सकल जना आणि पश्वादिकांना ।
ती खर्ची वीस कोटी स्व-परे-जन[12] पदीं धर्म-कृत्यांत नाना ॥
ऐसें ऐकूनि कोणी ह्मणतिल सतिनें आळसी लोक सारे ।
केले हें योग्य नाहीं, समजुत चुकिची ही असे खास बा रे ॥२९॥
होताहीं मालकमाचा प्रथम समज हा विप्रवर्यें तयाला ।
केलेल्या उत्तराला श्रवण करुनि तो फार संतुष्ट झाला ॥

---

१ महादेवाचीं लिंगें २ जपाच्या माळेला ३ चर्मी जोडे ४ भांडीं कुंडीं वगैरे ५ सोन्याच्या ६ रुप्याच्या ७ लोकांच्या पंक्ति ८ नमस्कार करण्यास ९ सर्व देशांहून १० तिच्यापायीं ११ दोन्ही कुलांचा उद्धार १२ आपल्या व दुसऱ्याच्या प्रदेशांत.

ऐका तें " साध्विनें या अपरिमित धना व्यर्थ खर्चास केलें ।
हा तुह्मी दोष त्यांना अगदिं फुकट कीं लादतां त्यांस बोले ॥३०॥

(मंदाक्रान्ता. )

या खर्चाच्या द्विगुणित जरी खर्च फौजेस केला ।
साध्वीनें त्या विपर्यि असतां, शांतता ही प्रजेला ॥
भोगायाला कधिं न मिळती वाटतें आपणाला "।
तेव्हां तोही श्रवण करुनी फार संतुष्ट झाला ॥ ३१ ॥

( उपजाति. )

मातेपरी प्रेम प्रजेवरी जी ।
ठेवी तसा धर्म करी बहू जी ॥
गुन्ह्यास शिक्षा बहु सौम्य देई ।
होती दयाळू जगतांत बाई ॥ ३२ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

कांठी उंच नसे जिची ताशिच जी ठेंगू नसे ही सती ।
बांधा स्थूल नसे उदास मन ही दुःखामुळें तें अती ॥
आनंदी मुख तें दिसे तरि सदा दासीं करी प्रेम जे ।
येई क्रोध तिला तदा तिजपुढें कोणी न जांया धजे ॥ ३३ ॥

( शिखरिणी. )

असत्याचा होता अगदिंच तिरस्कार सतिला ।
असे जात्या स्त्रीही तरि बहुत तें धैर्य तिजला ॥
प्रसंगीं येईहो, करि निवृति ती दुःखं-ततिची ।
असे मल्हाराची सुन ह्मणविण्या तीस सुरुची ॥ ३४ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

विप्रांना अति पूज्य मानुन सती ठेवी भरंसा अती ।
राजांना परकीय पत्र लिहिणें किंवा वसुला-प्रती ॥
धर्माचा विनियोग सर्व करवी विप्रांकडूनी सुधी ।
विप्रांनीं हि तमाच बे भरंवसा नाहींच केला कधीं ॥ ३५ ॥

( आर्या. )

गो-ब्राह्मण प्रतिपाळी, गो-वध राज्यामधें तिच्या नव्हता ।
व्हावा पर-राज्यांतहि, बंद ह्मणुनि यत्न साध्विचा होता ॥ ३६ ॥

१अमर्याद २ मालकम साहेबास ३ दुप्पट ४ राज्यांत ( प्रदेशांत ) ५ मालकमही ६ शरिराची काठी ७ चाकरांवर ८ खोटेपणाचा ९ निवारण १० दुःखाच्या रांगांची ११ आवड १२ गाई-ब्राम्हण १३ गोहत्या १४ दुसऱ्यांच्या राज्यांत.

परोपकारीं द्रव्या, खर्ची ती आश्रयार्थ विद्वाना ।
यास्तव वैदिक पंडित, शास्त्री लांबून येति तैं नाना ॥ ३७ ॥

कोणास शालजोड्या, धोतर-जोडे कुणास पागोटीं ।
गवई गोंधळि यांना, देई बक्षीस ती कडीं कंठी ॥ ३८ ॥

कधिं कधिं विद्वानांना, धाडुनि पत्रेंहि बोलवी साध्वी ।
उचितादर करुनि सदा, मान-धनांनीं तयां बहू सुखवी ॥३९॥

प्रसिद्ध मयुरकवीला, ती साध्वी पालखींत बैसवुन ।
आणुनि महेश्वराला, किति-तरि दिन त्यास ठेवि गौरवुनें ॥४०॥

जैशी विद्वत्ता ती, पाही तैसाचि तो सदाचार ।
आनंदफंदि मार्गी, गोष्टी सांगूनि आणिला चार ॥४१॥

एके-वेळीं फंदी, येउन तो त्या महेश्वरींहि करी ।
डफ तुंतुण्यादिकांनीं, नाच जनांच्या पुढेंच ही स्वारी ॥४२॥

ऐकूनि हें सतीनें, बोलावुन त्यास आणिलें जवळीं ।
बोले "द्विज-वर असतां, डाग कसा लावितां तुम्ही स्वकुळीं ॥४३॥

निंद्य असे हा धंदा, अन्य प्रतिष्ठित कराच उद्योग ।
व्हावा रविशीं विधुचा, परि राहूशीं कधीं न हो योग" ॥४४॥

ऐकुन उपदेश तिचा, फेंकुन दिधलें डफादिकां त्यानें ।
बुद्धीचा सद्व्यय तो, करुनि पुढें मिळवि द्रव्य, यश, वसनें ॥४५॥

बालपणीं या सतिला, शिक्षण होतें गुरू-कडून जरा ।
झाला उपयोग तिला, प्राकृत पोथ्या बघावयास बरा ॥४६॥

विद्वत्सहवासानें, संस्कृत-भाषाहि जाणण्यास सती ।
लागे हळू हळू ती, वाचन श्रवणास ती करीच अती ॥४७॥

---

१ मोरोपंताला २ आदर करून ३ चांगली वागणूक ४ सुर्याशीं ५ चंद्राचा ६ राहु-ग्रहाशीं ७ बोध ८ आनंदफंदीनें ९ वस्त्रें १० विद्वानांच्या सहवासानें.

राज्य-व्यवहाराचे, धार्मिक ही ग्रंथ पाहिले सतिनें ।
केलें मनन तयांचें, मग केले कायदे स्वतां मतिनें ॥ ४८ ॥
साध्वी-इतकी ज्ञानी, त्या वेळीं भारतीं नसे नारी ।
तरि गर्व नसे सतिला, स्व-स्तुति-श्रवणा कधींच ती न करी ॥४९॥
(युग्म) एकें विप्रें स्तुतिपर, ग्रंथ तिला वाचुनीच दाखविला ।
'मी मृत्यु-लोकची स्त्री, पापी हें शोभतें मुळीं न मला ।' ५० ॥
ईश्वर-स्तुति सोडुनिया, मनुज-स्तुति ही मुळीं नसे उचित' ।
बोलुनि ग्रंथ सतीनें फेंकुन दिधलाच नर्मदानदिंत ॥ ५१ ॥
(दान-स्वभाव-दर्शन नामक १३ वा अंक समाप्त)

## अंक १४ वा.

### ( कैलासगमन. )

( स्रग्धरा. )

प्रावृट्कालीं प्रवासा, जर पथिक निघे पावसाच्या सरींला ।
एकामागून एका तर निमुटपणें सोसणें भाग त्याला ॥
केव्हां आल्हाद देई रवि निज-किरणीं दैव त्याचें ह्मणावें ।
धारांना रोज त्याला परि निज-शरिरीं लागतें नित्य घ्यावें ॥ १ ॥
तैसें हें ह्या सतीचें चरित मन गमे दुःखं-जीमूत-धारा ।
श्रोत्यांचें वाचकांचें मन करिति सदा आर्द्र हो नेत्रद्वारा ॥
येऊनी बाह्य-देशीं वसन भिजविती नेत्र-योगें समस्त ।
कांहीं भागांत थोडा सुख-रवि दिसला त्या-विना सर्व अस्त ॥ २ ॥

( शिखरिणी. )

विधात्याचा हेतू सतिस निकषीं लावुन तिच्या ।
पुरे धैर्याला हो बघुन मग द्यावेंच सतिच्या ॥
गुणायोग्य स्थाना धरुन मनिं ऐसेंच विधि हा ।
छळी या भागीं हो श्रवण करणें दुःखदचि हा ॥ ३ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

मुक्ताबाइस त्या महेश्वरिं दिलें होते जयाच्या घरीं ।
तो संस्थानिक नीतिमान असुनी संपत्ति होती बरी ॥

१ हिंदुस्थानांत २ स्त्री ३ आपली स्तुती ऐकणें ४ हें वि. 'मी' याचें (मी पापी) ५ पावसाळ्यांत ६ दुःखरूप मेघांच्या धारा ७ ओलें (सद्गदित) ८ सुख-रूप सूर्य ९ ब्रह्मदेवाचा १० कसावर ११ हा भाग १२ पानशे.

पातिव्रत्य तसे दुजे सुगुण ती मातेकडूनी[1] अती ।
घेऊनी अगदीं तिच्या-परिच ही वागे असे नम्र ती ॥ ४ ॥

(स्रग्धरा.)

या नामी वर्तनानें निज-सुगुण-गणें[2] ती सतीच्या[3] मनाला ।
दुःखाचा पाडि थोडा विसर मग तिला[4] पुत्रही एक झाला ॥
पुत्राचें सौख्य तैसें, पति-सुख दुसरें वैभवाचें[5] असेही ।
ऐशा सौख्य-त्रयींच्या-मधिं दिन अपलें घालवी कन्यका[6] ही ॥५॥

(शिखरिणी.)

गुणी मुक्ताबाई प्रतिकृति[7] सतीचीच दुसरी ।
असे लोकां भासे पतिसहि सुखाची खनि[8] घरीं ॥
अहल्याबाईही कधिं कधिं सुतेचे[9] गुण सुखी ।
कथी, मुक्ताबाई प्रमद बहु मानी निजसुखीं ॥ ६ ॥

(स्रग्धरा.)

दुर्दैवानें सतीच्या सुख-ततिंत[10] तिच्या[11] मृत्तिका[12] कालवोनी ।
कौटुंबीयांस[13] दुःखीं तळमळत दिलें टाकुनी सौख्य मानी[14] ॥
देवानें जें दिलें त्या नशिब झडकरीं न्यावया सिद्ध होतें ।
वाटे त्यांलाचि[15] देवाहुन अधिक किं हो शक्ति तेंव्हां असे ते[16] ॥७॥
देवा-दैवांत लोकां-प्रति बल दिसतें फार दैवास, त्यांत ।
मात्रेचाएक तोटा म्हणुन सहजची दैव त्याहून जास्त ॥
या दैवानें जनांला अजवरि छळिलें फार हो फार साच ।
सीतेला पांडवांला नृपति-वर दुजा विक्रमाला तसेंच ॥ ८ ॥

(शिखरिणी.)

दहा बारा वर्षे सुखयुत असे तत्प्रिय[17]-सुता ।
परी तापी[18] काळा यम अवकृपेनें हरि नता ॥
तिच्या सत्पुत्राला करि बहुत दुःखास सुदती[19] ।
तदा माता[20] बोधा करुन समजावी तिस अती ॥ ९ ॥

---

१ आई (अहल्या बाई) कडून २ आपल्या चांगल्या गुणांच्या समुदायानें ३ अहल्या बाईच्या ४ मुक्ताबाईला ५ संपत्तीचें ६ मुलगी (मुक्ताबाई) ७ प्रतिमा ८ खाण ९ हें विशेषण 'सुतेचे' १० सुखपरंपरेंत ११ मुक्ताबाईच्या १२ माती १३ कुटुंबांतील लोकांस १४ याचा कर्ता 'दुर्दैव' १५ दैवाला १६ ती (शक्ति) १७ अहल्या बाईची प्रिय कन्या १८ ताप देणारा १९ सुंदरी (मुक्ताबाई) २० आई.

( शार्दूल-विक्रीडित. )

औदासिन्य[1] तदा कसें तरि महत्कष्टें गिळी सन्मती[2] ।
व्हावा तुष्ट पती तशी जननिही[3] कष्टी न व्हावी अती ॥
या-साठीं सुख मानुनी मग पुन्हां वागावया लागली ।
तों दुर्दैव पुन्हां करी तिजवरी हल्ला बिचारी भली ॥ १० ॥

( स्त्रग्धरा. )

पुत्राचें दुःख कोठें विसरत असतां आणखी एक घाला ।
आला, काळें सुतेच्या पति-वरिच किहो मारिला थोर भाला ॥
मुक्ताबाई धरेला धडकिन पडली पाहतां ही कुठार ।
शोकानें व्याप्त भारी सकल जन तसी ती प्रसू[4] होइ फार ॥ ११ ॥
" या माझ्या लाडकीला मजपरिच कसें दुःख भोगावयाचें ।
देवा त्वां आणिलें रे अलिकंच[5] फुटकें काय माझ्या मुलीचें ॥
किंवा हें पाप माझें तिजप्रति फळलें वैर वा साधुनीया ।
जामाता[6] जाइ स्वर्गा " वदुन जननिनें घातलें त्याच ठायां ॥ १२ ॥
मुक्ताबाई सतीच्या[7] उठुन मग मिठी कंठिं घाली पहातां ।
भारी शोकाश्रु ढाळी रड रडुन करी नेत्रही शुष्क माता ॥
मातेनें त्या सुतेनें बहुत समय हा शोक केलाच, बोले ।
मुक्ताबाईस माता मग " नशिब तसें प्राप्त होतेंच बाले " ॥ १३ ॥

( शार्दूल-विक्रीडित. ) ( युग्म )

तेव्हां ती तनया रडे गिळुनिया माते-प्रती बोलली ।
" मी जातेंच सती मला जननि तूं आशीर्वचा[8] दे भली " ॥
ऐकूनी प्रसुचा सुटूनि सगळा तैं धीर बोले तिला ।
" झाला काय मुली विचार तुज हा कोणी नसे गे मला " ॥ १४ ॥
बाले " मी तुजला बघूनि गिळिलें तें दुःख सारें तदा ।
जासी टाकुनि एकटी मजप्रती, देऊं नको आपदा ॥
आहे प्रेम तुझें खरें मजवरी, टाकून जाऊं नको ।
देवाची तुजला असे शपथ गे मी दीन हो बायको " ॥ १५ ॥

---

१ खिन्नता २ चांगल्या बुद्धीची ( मुक्ताबाई ) ३ ( अहल्याबाई ) ४ आई
५ कपाळ ६ जांवाई ७ अहल्याबाईच्या ८ आशीर्वाद.

“ आई प्रेम तुझें असें मजवरी, ” बोले सुता ती तिला ।
“ या-साठीं ह्मणणें तुझें सकल गे, तें मान्य व्हावें मला ॥
आई धार्मिक आयु संपुन तुझें स्वर्गास जातां परी ।
आहे कोण मला विचार करुनी दे शिष्टि[2] जायाँ[3] बरी ॥ १६ ॥

( स्रग्धरा. )

ऐकोनी शब्द माता उपलसम तदा स्तब्ध बैसे, सतीला ।
धर्माच्या आड येणें हरकत करणें धर्मकृत्या, मतीला ॥
यांची भीतीच वाटे, ह्मणुन मुलिवरी नाहिं केला जुलूम ।
राहायाला सतीनें, परि सदय मना सोडिना वत्स-प्रेम ॥ १७ ॥

( शार्दूल-विक्रीडित. )

झाला निश्चय जावयास मुलिचा मांगल्य-स्नाना तिनें ।
केलें, आणि सतीस योग्य वसना नेसूनिया, दागिने ॥
वाटी सर्व वधूं-प्रती, मळवटा भाळीं भरी ती सुधी ।
जाया उत्सुख जाहली पति-कडे, “ भेटेन वाटे कधीं ” ॥ १८ ॥

कंठीं घालुन कर्पुरादिक स्रजां मातेस वंदी सती ।
घालूनीच तिच्या गळ्यास मिठिला, मागे निरोपाप्रती ॥
दुःखाऽऽवेग न साहुनी जननि ती किंकाळली तैं अती ।
“ जासी काय मुली त्यजून मजला दुःखांत तूं गे सती ” ॥ १९ ॥
मातेला मग बोलणें न सुचलें झांकून नेत्रांस ती ।
निश्चेष्टा पडली, बघून मुलगी खेदास पावे अती ॥
आतां कांहिं नसे उपाय ह्मणुनी मातेस बोले सती ।
“ आई सोड ममत्व बोध मजला आतां नको सन्मती ” ॥ २० ॥

“ आई प्रेम तुझें विशेष कारितां स्वर्गीं तुझी भेट ती ।
होवो राहुं तिथें वियोग नसतां, मार्ग-प्रतीक्षा पती ॥
स्वर्गीं गे कारितो निरोप मजला आई दिला पाहिजे ” ।
तेव्हां ती वदली “ मुली तुज करी तें योग्य वाटेच जें ” ॥ २१ ॥

---

१ दानधर्म करणारें २ आज्ञा ३ सती जाण्यास ४ दगडासारखी ५ मंगलस्नान ६ स्त्रियांना ७ माळा ८ बेशुद्ध ( चलनवलन विरहित ) ९ ममता

प्रासादांतुन काढिलें शेव तदा कन्या सर्व चालली ।
देखावाच बघूनि वृद्ध जननी बेशुद्ध ती जाहली ॥
विप्रांनीं धरिलें तिला मग निवे जाया, स्मशानां-प्रती ।
येवोनी मग ठेविती चितिवरी ते लोक प्रेताप्रती ॥ २२ ॥
जीं कृत्यें कथिलीं द्विजें सतिप्रती तीं तीं तिनें चांगलीं ।
आनंदें करुनी सखींप्रति तदा सौभाग्य-दानें दिलीं ॥
त्यांचा घेइ निरोप, विप्र नमुनी आशीस ही घेतलें ।
मातेच्या चरणीं प्रणाम करि ती, त्यांनीं निरोपा दिलें ॥ २३॥

( वसंत-तिलका. )

केला प्रवेश मग त्या सतिनें चितेंत ।
आलिंगिला प्रियपती प्रमुदेंच तींत ॥
अग्नी तिनें झडकरीं मग चेतवीला ।
जाळून टाकुन दिलें अनलें तयांला ॥ २४ ॥

( उपजाति. )

चितेमधें जैं शिरली सुता ती ।
माता धरी धैर्य बहू स्वचित्तीं ॥
परंतु साध्वी बघतांच ज्वाला ।
बेशुद्ध झाली पडली धरेला ॥ २५ ॥

( स्रग्धरा. )

" मुक्ताबाई कुठें गे मज निरवुन तूं एकटी चाललीस ।
भेटे तूं एकदा गे शिव शिव मुलगी चालली काय खास " ॥
ऐसा आलाप त्यांनीं बहुत करुनिया लोकही साश्रु केले ।
जायाला धांवल्या त्या अनलँ शरणिं हो तैं द्विजीं थांबवीलें ॥२६॥

( द्रुत-विलंबित. )

धरुन गच्च तिला क्षितिलाँ द्विजीं ।
बसविली शरिरास पिळीच जी ॥
प्रथम धाक पुढें करि प्रार्थना ।
" सहन हें मजला अँकँ होइना " ॥ २७ ॥

---

१ राजवाड्यांतून २ प्रेत ३ आशीर्वादास ४ आनंदानेंच ५ अग्नीनें ६ मुक्ताबाई व तिचा नवरा यांना ७ अग्निसरणावर ८ ब्राह्मणांनीं ९ पृथ्वीवर १० दुःख.

( शार्दूल-विक्रीडित )

सर्वांना प्रिय मावली तिजप्रती सोडावयाला कसें ।
सांगा होतिल ते तयार द्विज तैं, साध्वी सतीला असें ॥
बोलोनी समजाविती ' जननि हो आह्मां जनां संप्रती ।
आई बाप धनी तुह्मीच असतां जातां कुठें सन्मती' ॥ २८ ॥

गेली पार चिता जळुन मग ये शुद्धी-वरी सन्मती ।
विप्रांना वदली पुढें विधि कसा, तैं विप्र जें सांगती ॥
तें तें सर्व करून खिन्न असतां गांभीर्य[1] दावी वरी ।
सेझीं[2] पाउल ठेवतां भडकलें तें चित्त शोका करी ॥ २९ ॥

एकांतीं बसली तदा रडत ती खाण्या-पिण्या वांचुनी ।
काढी ती दिन तीन त्या स्थिति-मधें, केलें विवेका मनीं ॥
केलें दान अती सती स्वतनया गेली तिथें तैं भलें ।
मोठें देउळ बांधिलें अजुनही वाटे नवें चांगलें ॥ ३० ॥

( आर्या )

हें दुःख त्या सतीचें, शेवटचें अन्य दुःख नच झालें ।
उदार आणी धार्मिक, शरीर दुःखाप्त[3] होउनी खचलें ॥ ३१ ॥

पुत्रापरि प्रेम जनीं, औदार्य[4] लाजवीच कर्णाला ।
त्या साध्वीस विभूनें[5], दुःख दिलें काय हो ह्मणूं त्याला ॥ ३२ ॥

न्यायी देव ह्मणावा, तर न्यायाच्या विरुद्ध हें घडलें ।
अन्यायी ह्मणणें हें, चुकिचें होईल हें मला गमलें ॥ ३३ ॥

नाहीं देव ह्मणावा तर मग निर्माण जग कसें झालें ।
तेव्हां देव असावा, ऐसें मत पूर्ण होउनी गेलें ॥ ३४ ॥

निर्दय त्यास ह्मणावें, तर गेला धाउनी सभेमाजीं ।
राखावयास लज्जा, सतिची कैसा दयानिधी गाजी[6] ॥ ३५ ॥

---

१ गंभीरपणा २ वाड्यांत ३ दुःखानें भरलेली ४ उदारपणानें ५ परमेश्वरानें ६ प्रख्यात

( शार्दूल-विक्रीडित. )

सावित्रीस तसेंच दुःख दिधलें सीतेस, तारामती ।
दुःखाब्धींत[1] बुडे तसी द्रुपदजा तैसी[2] अहल्यासती[3] ॥
या सर्वांस पुढें इथें सुख दिलें त्या ईश्वरानें परी ।
तैसें सौख्य हिलाच कां न दिधलें? कां भेद त्याच्या घरीं ॥३६॥

( आर्या )

याचा निर्णय करणें, विद्वानांच्या -वरीच सोंपवितों ।
जें शक्य मृगेंद्राला, तें करण्या प्राणि कोणता धजतो ?॥३७॥

( शिखरिणी )

मुता स्वर्गीं जाता प्रियकर सतीला बहुत जी ।
सती सोडी कृत्यें, सकल इहलोकीं सुखद जीं ॥
तुकोजीला[4] हीही तुह्मि निघुन यावें झडकरीं ॥
धरा ही राज्याची अनिर्में तुमची हो निजकरीं ॥ ३८ ॥

( स्रग्धरा )

श्रीमंतांचा निजामा वर कर-हरणा-साठिं हल्ला करावा ।
ऐसा तैं बेत झाला सबब न निघावे इंदुरालाच 'रांवा'[5] ॥
ऐके जेव्हां सती हें प्रतिनिधि-वरि[6] ती टाकुनी कारभार ।
झाली ती साध्वि तेव्हां वरिं सुखद कृती त्या कराया तयार ॥३९॥
झालीं शारीर दुःखें सातिस अजवरी मानसींचींहि झाली !
त्यायोगें क्षीणकाया वयहि बहुत हो साठ वर्षेंहि गेलीं ॥
तेव्हां आतां परत्रीं[7] गमनच करणें प्राप्त आहे ह्मणून ।
स्नानाला तीन वेळां करुन हर पुजी पार्थिवाला करून॥४०॥
झुंडी यात्रेकरूंच्या सतिप्रति बघण्या लांब लांबुन आल्या ।
पंक्ती तैशा नृपांच्या सति-चरणीं शिरा वाहण्याला मिळाल्या॥
त्यांचा सन्मान साध्वी करुन सुखवि त्या भेटुनीही तशीच ।
झाली हो क्षीणशक्ती शयनिं पहुडली बाइ त्या शांतशीच ॥ ४१ ॥

---

१ दुःख-समुद्रांत २ गौतमाची बायको ३ अहल्या बाईला ४ लगाम ५ तुकोजी-ला ६ कारभाऱ्यावर ७ स्वर्गांत ८ सुखदेणारीं ९ स्वर्गांत

( शार्दूल-विक्रीडित. )

भेटी वंदाचि जाहल्या द्विजवरां अन्नादिकें तर्पणें ।
वस्त्रा[1]ऽलंकृति-दान दंपति[2]-प्रती देऊन सन्मानणें ॥
अन्यांही सकलां जनांस दिधलें वांछीत जें जें असे ।
ऐसा तो क्रम चार मास सतिनें सांभाळिला हो असे ॥ ४२ ॥
त्यांचें पुण्य अपार यास्तव सती-लागीं बिछान्यावरी ।
काढावे दिन आठ लागति पुढें गेल्याच बाई वैरीं[3] ॥
सत्राशों[4]-वरतींच सप्तदश त्या संवत्सराच्या-मधें ।
झाला काळ चतुर्दशी असित[5] ती त्या श्रावणाच्या-मधें ॥ ४३ ॥

( स्रग्धरा. )

संताजीनें[6] सतीच्या स्वजनसह तदा और्ध्वकार्यास केलें ।
तेव्हां लक्षावधी ते जन जननिप्रती पोंचवीण्यास आले ॥
" देवा ठेवी सतीला निज-चरणिं " असें प्रार्थिलें हो तयांनीं ।
नामाचा घोष मोठा करुन दश दिशा टाकिल्या त्या भरोनी ॥ ४४ ॥
हिंदुस्थानांत सारे श्रवण करुन ही दुःखवार्ता सतीची ।
भारी शोका करूनी हळहळति बहू वर्णिती कीर्ति साची ॥
माध्वीची सुप्रजा तैं अपरिमित अशा दुःखैं[7]-पंकार्णवांत ।
तैसें ते पेशवेही नृपति[8]-वर दुजे मग्न झाले तयांत ॥ ४५ ॥
तारा मंदोदरी ती द्रुपद-नृपसुता-द्रौपदी आणि सीता ।
सावित्री या स्त्रियांची ऋषि-वर भगवान् व्यास कीर्ती अनंता ।
गावोनी हर्ष पावे तशिच गुणवती ही सती शुद्ध नामी ।
तेव्हां तो व्यास व्हावा सति गुण-स्तवना अल्पबुद्धी किती मी ॥ ४६ ॥

( आर्या. )

' गावीं संत-चरित्रें ' ऐसी आज्ञा प्रसिद्ध तुकयाची ।
तीतें अनुसरलों मी, कीर्ति जरा बोललों महा-सतिची ॥ ४७ ॥
खंडेराव कऱ्हेच्या, कांठीं राहून भक्त सांभाळी ।
त्या मम कुल-देवाच्या, अर्पण करितोंच ग्रंथ पदकमळीं ॥ ४८ ॥

---

१ वस्त्रें व दागिने यांचें दान २ जोडप्यांना ३ स्वर्गी ४ शके १७१७ त ५ कृष्ण ६ तुकोजींच्याभावाचें नांव ७ दुःखरूपी चिखलाच्या समुद्रांत ८ श्रेष्ठ राजे ९ अमर्याद


( स्रग्धरा. )

श्री-कृष्णें विप्रवर्या मुठभर पृथुकांसाठिं सौवर्णस्थाना ।
देऊनी निर्धनाला सदन करुनही नाशिले क्लेश नाना ॥
तैसा मीही दरिद्री पृथुकपरिच हें काव्य माझें दयाळा ।
श्रीकृष्णाच्या प्रमाणें वितरण हि करां प्रार्थितों लोकपाळा[1] ॥ ४९ ॥

( कैलास—गमन नामक १४ अंक समाप्त. )

( श्री-खंडेरावार्पणमस्तु शुभंभूयात्. )

१ सर्व लोकांच्या पालका परमेश्वरा खंडेरावा.



## — सुज्ञांस प्रार्थना. —

( शार्दूल-विक्रीडित. )

बुद्धी अल्प असे तसी मजप्रती विद्याहि अल्पा असे ।
विश्वाचें मज ज्ञान अल्प प्रभुची भक्ती अनल्पा[1] वसे ॥
साध्वींचें यश अल्प मी कथियलें; मोदेंच विद्वज्जनीं[2] ।
चित्ता देउनि पाहिलें ह्मणुन मी आभारि आहें मनीं ॥ १ ॥

शंभूनें विष कंठि इंदु धरिला आहे जसा शेखरीं ।
तैसें यांतिल दोष आणि गुणही ध्यावेंच विद्वद्वरीं ॥
माझा हा पहिलाच यत्न करितां त्यागोनि दोषांप्रती ।
द्याहो उत्सुकता मला प्रणमितों[3] युष्मत्पदां[4] संप्रती ॥ २ ॥

---

१ पुष्कळ २ विद्वानांनीं ३ नमस्कार करितों ४ आपल्या पदकमलास.

समाप्त.